cmyk

## संपादकीय

### भारतीय संविधानाचे मंथन स्वागतार्हेच

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लोकसभेत सुयोग्य चर्चा झडली. भारताची समर्पित घटना तेव्हाही कोणत्या देवाला किंवा शक्तीला समर्पित नव्हती आणि भविष्यातही ती असणार नाही अशी आशा भारत बाळगून आहे. संविधानाची ही शक्ती कधी क्षीण झाल्यासारखी वाटते तर कधी अचानकच नकळतपणे ती झळाळून उठते. ७५ वर्षांत अनेकदा घटनेबद्दल चिंता व्यक्त करून सुद्धा ती अबाधित आहे. याबद्दल घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे, भारतीय घटनेसाठी चिंता आणि चिंतन करून ज्यांनी त्याला एक भक्कम स्वरूप प्राप्त करून दिले त्यांचे या निमित्ताने ऋण व्यक्त करणे आवश्यक आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२३४ | मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये


### लाडक्या बहिणींसाठी १४०० कोटींची तरतूद

नागपूरः लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजेनासठी १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पहिल्या दिवशी ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या आहेत, त्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजेनासठी १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी ही तरतूद करण्यात आल्याचे समजते. महिलांना दिला जाणारा हफ्ता १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्याची तरतूद अद्याप तरी करण्यात आलेली नाही.

# देशभरात सोयाबीन खरेदीचा बोजवारा

## केवळ ४ लाख १५ हजार टनांचीच खरेदी; केंद्रीय कृषिमंत्र्यांचा दावा फोल

**मुंबई । प्रतिनिधी**

**अडचणीत आलेल्या सोयाबीन उत्पादकांना दिलासा देण्यासाठी सरकारने हमीभावाने खरेदी सुरु केली. पण खरेदी सुरु होऊन तब्बल २ महिने पूर्ण झाले. तरीही देशभरात उद्दीष्टाच्या केवळ १२ टक्केच खरेदी झाली. सरकारने मोठा गाजावाजा करत एकूण उत्पादनाच्या २६ टक्के म्हणजेच ३३ लाख ६० हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले. मात्र आतापर्यंत केवळ ४ लाख १५ हजार टनांचीच खरेदी झाली.**



केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी शेतकऱ्यांचा सर्व माल सरकार हमीभावाने खरेदी करते असा दावा संसदेत अनेकदा केला आहे. मात्र प्रत्यक्षात हा दावा फोल ठरत आहे. कारण सरकार केवळ हमीभावाने खरेदीचे उद्दीष्ट जाहीर करते. मात्र प्रत्यक्षात तशी खरेदी होत नाही, हे सोयाबीनवरून स्पष्ट झाले. आंतरराष्ट्रीय बाजारातील मंदी, देशात स्वस्त डीडीजीएसचा वाढत असलेला वापर आणि वाढलेले उत्पादन यामुळे सोयाबीनचे भाव दबावात आहेत. महाराष्ट्र हा सोयाबीन लागवड आणि उत्पादनात मध्य प्रदेशनंतर आघाडीवर आहे. हंगाम ◀◀ पान २ वर

### महाराष्ट्र सरकारचे दुर्लक्ष

केंद्रीय गृहमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी नागपूर निवडणुकीच्या प्रचारात ओलाव्याची अट १५ टक्के करण्याचे जाहीर केले. तसेही पत्रही राज्यांना देण्यात आले. मात्र राज्य सरकारने अजूनही त्यावर निर्णय घेतलेला नाही. दुसरे म्हणजे खरेदी केंद्रे कमी प्रमाणात सुरु आहेत. राज्यात जवळपास ५३० खरेदी केंद्रे सुरु आहेत. पण या खरेदी केंद्रांवरची प्रक्रिया खूपच धिमी आहे. त्यामुळे सोयाबीन खरेदीची गती कमी आहे, मात्र याची दखल राज्य सरकारकडून अजूनही घेण्यात आलेली नाही.

# शपथविधीनंतर नाराजीनाट्य

## मंत्रिमंडळ विस्तारानंतर सेनेचे ४ बडे नेते नाराज, एकाचा पदाचा राजीनामा









**मुंबई । प्रतिनिधी**

**या मंत्रिमंडळ विस्तारात स्थान न मिळाल्याने शिवसेनेतील काही बडे नेते नाराज आहेत. त्यामध्ये अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, दीपक केसरकर, विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे यांच्या नावांचा समावेश आहे. या नेत्यांमधून नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी उघड नाराजी व्यक्त करत आपल्या शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा देखील दिला आहे.**

फडणवीस सरकारचा पहिला मंत्रिमंडळ विस्तार रविवारी नागपुरात झाला. ३३ कॅबिनेट व ६ राज्यमंत्र्यांनी शपथ घेतली. यात भाजपचे १९ (१६ कॅबिनेट व ६ राज्यमंत्री) , शिंदेसेनेच्या ११ (९ कॅबिनेट व २ राज्यमंत्री) व राष्ट्रवादीचे ९ मंत्र्यांचा ◀◀ पान २ वर

### तानाजी सावंतांनी फेसबुकचा डीपी बदलला

#### शिवसेना नाव अन् चिन्हही हटवले

शिवसेना पक्षातील पहिल्या फळीतील नेते असलेल्या आमदार तानाजी सावंत यांना मंत्रिपदाची संधी न मिळाल्याने ते नाराज झाले आहेत. त्यामुळे, तानाजी सावंत नाराज असून त्यांनी माध्यमांशी बोलण्याचेही टाळले आहे. याबाबत, त्यांच्या कार्यालयाकडून माध्यमांसाठी पत्रकही जारी करण्यात आले होते. आता, तानाजी सावंत यांनी त्यांच्या फेसबुकचा प्रोफाईल फोटो बदलल्याने चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे सावंत यांनी आपल्या प्रोफाईलमधील शिवसेना हे ◀◀ पान २ वर

### माझ्यासोबत कोणाचीच चर्चा नाही ; नाराज सुधीर मुनगंटीवार स्पष्टच बोलले


नागपूरः भाजप नेते आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. आदल्या दिवशीपर्यंत आपले नाव मंत्रिपदाच्या यादीत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले होते. पण दुसऱ्या दिवशी कसे गायब झाले माहिती नाही असे म्हणत सुधीर मुनगंटीवार यांनी नाराजी व्यक्त केली. दरम्यान, मंत्रीपद न देण्यामागे विशिष्ट कारण असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तसेच



मंत्रिपदाबाबत सुधीर मुनगंटीवार यांच्याशी प्रदीर्घ चर्चा झाली असेही फडणवीस म्हणाले. पण अशी ◀◀ पान २ वर

### नाराज छगन भुजबळ बंडाच्या तयारीत?

नाशिकः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार रविवारी झाला. या मंत्रिमंडळ विस्तारात उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून नऊ जणांनी मंत्रिपदाची शपथ



घेतली. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी मंत्री छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात संधी मिळणार अशी चर्चा असतानाच त्यांना मंत्रिमंडळातून डावलण्यात आले. त्यानंतर त्यांची आपल्याच पक्षातील नेत्यांबाबतची ◀◀ पान २ वर

### बीड, परभणी मुद्द्यांवर विरोधकांचे पायऱ्यांवर आंदोलन

#### राज्यातील जनतेत तीव्र संताप–नाना पटोले




**नागपूर । प्रतिनिधी**

**अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी परभणी व बीड मधील घटनांचा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित करण्यात आला. संविधानाची विटंबना व सरपंचाची निघृण हत्या या दोन्ही घटना भाजपा सरकार आल्यानंतर घडल्या आहेत. परभणीत एका आंबेडकरी विचाराच्या कार्यकर्त्याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला आहे. या घटना अत्यंत गंभीर असून आंबेडकरी अनुयायी व राज्यातील जनतेत प्रचंड संताप आहे. सरकारने या मुद्द्यांवर उत्तर द्यायची तयारी दाखवावी, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानसभेत परभणी व बीडच्या घटनांचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अध्यक्ष ज्या दिवशी चर्चा करण्यास सांगतील त्या दिवशी चर्चा करू असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांना किडनॅप केल्याची माहिती पोलिसांना होती पण देशमुख ◀◀ पान २ वर

### महाराष्ट्राला तीन आठवड्यांपासून गृहमंत्रीच नाही - सुप्रिया सुळे

नवी दिल्लीः बीड आणि परभणीमध्ये झालेल्या घटना दुर्दैवी आहेत. महाराष्ट्राला तीन आठवड्यांपासून गृहमंत्री नाहीत. माझी अपेक्षा होती की एवढे मोठें बहुमत जर महाराष्ट्राच्या मायबाप जनतेने यांना दिले आहे तर त्यांनी कामाला लागायला हवे होते, असा उपरोधिक टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी नवी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस सरकारला लगावला. यावर बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, परभणी रेल्वे ◀◀ पान २ वर

# मारहाणीमुळेच सूर्यवंशीचा मृत्यू

## शवविच्छेदन अहवालात स्पष्ट नोंद, आंबेडकरी अनुयायांत संतापाची लाट

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**परभणी येथील आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टेम रिपोर्ट अर्थात शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यात त्यांचा मृत्यू मारहाणीमुळेच झाल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. परिणामी, आंबेडकरी अनुयायांत संतापाची तीव्र लाट उसळली आहे.**

परभणी शहरात गत आठवड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापुढील संविधानाची विटंबना करण्यात आली होती. या घटनेचे शहरात तीव्र पडसाद उमटले होते. आंदोलकांनी वाहनांची प्रचंड तोडफोड केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये अनेकांना अटक करण्यात आली होती. त्यात ३५ वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी यांचाही समावेश होता. सोमनाथ सूर्यवंशी यांचा रविवारी पोलिस कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टेम ऑन कॅमेरा करण्याची मागणी केली होती. त्यानुसार सोमनाथ सूर्यवंशी यांचे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या शवविच्छेदनाचा अहवाल समोर आला आहे. त्यात सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात ◀◀ पान २ वर

### प्रकाश आंबेडकर परभणीत ठाण मांडून

दुसरीकडे, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सोमवारी परभणीला भेट देऊन पीडित कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी त्यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्यासह त्यांच्या न्यायासाठी लढा देण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांनी स्थानिक गेस्ट हाऊसमध्ये आंबेडकरी कार्यकर्त्यांशी संवादही साधला. त्यात त्यांना पोलिसांनी राबवलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये झालेल्या अमानुष मारहाणीची माहिती देण्यात आली. त्याचे अनेक व्हिडिओ त्यांना दाखवण्यात आले. आंबेडकर हे परभणीत ठाण मांडून असल्याचे सांगण्यात येत आहे.

# स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणी आ.संदीप क्षीरसागर आक्रमक

## आठवडाभरात योग्य पाऊले न उचलल्यास रस्त्यावर उतरणार



**नागपूर । प्रतिनिधी**

**मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरनातील नराधम आरोपी अजूनही मोकाटच आहेत. अतिशय विदारक प्रकरण असताना यातील आरोपी अटक होत नाहीत. प्रशासनाकडून या प्रकरणात दिरंगाई कशाबद्दल होत आहे? असा सवाल उपस्थित करत मस्साजोग प्रकरणी, नागपूर येथे सुरू असलेल्या विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आ.संदीप क्षीरसागर यांनी आक्रमक होत विधिमंडळ परिसरात आंदोलन केले.** ◀◀ पान २ वर

### वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासा

स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात वाल्मिक कराड हे मुख्य सूत्रधार असू शकतात. मारेकरी असणारे सर्व आरोपी हे वाल्मिक कराड यांचे निकटवर्तीय आहेत हे स्पष्ट आहे. वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपास केवळ माझी एकट्याची नसून एकंदरीत देशमुख कुटुंबीय, सर्व मस्साजोग गाववासीय आणि जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी यांची आहे त्यामुळे एकदा वाल्मिक कराड यांचे कॉल रेकॉर्ड तपासले तर सत्य पुराव्यासह बाहेर येईल असेही आ.संदीप क्षीरसागर यांनी यावेळी म्हटले.

### बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणी

रामकृष्ण बांगर हे बीड जिल्ह्यातील एक संस्थाचालक आहेत. त्यांची संस्था वाल्मीक कराड यांना बळकावयची आहे. त्यामुळे बांगर कुटुंबियांवर गंभीर स्वरूपाचे खोटे गुन्हे दाखल करून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बांगर कुटुंबियांना संरक्षण देण्याची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ डिसेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड : १८.०० क्विंटल | १,९८१ | २,४०० | २,१५० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : ८.०० क्विंटल | ५,००० | ६,८०१ | ६,१३७ |
| उडीद : ४.०० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| बाजरी: २१.०० क्विंटल | २,०४१ | ४,३३० | ३,५११ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ३,९६६ | ४,०२० | ३,९९१ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,४०१ | ६,८०१ | ५,४०१ |


# भारतात विषमतेची पातळी चिंताजनक!

## फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ थॉमस पिकेट्टी यांची चिंता, अतिश्रीमंतावर कर आकारण्याचे आवाहन

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ थॉमस पिकेट्टी यांनी विषमतेची चिंताजनक पातळी सांगून भारताला अतिश्रीमंतांवर कर आकारण्याचे आवाहन केले आहे. दिल्लीस्थित थिंक टँक आरआयएस आणि दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स यांनी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात बोलताना, कॅपिटल इन २१ व्या शतकातील लेखकाने भारताला जी २० अर्थमंत्र्यांच्या जुलैमध्ये जगातील सर्वात मोठ्या संपत्तीवर कर**





**लावण्यात सहकार्य करण्याच्या प्रतिज्ञानुसार कार्य करण्याचे आवाहन केले.**

१०० दशलक्ष (१.१८ दशलक्ष) पेक्षा जास्त मालमत्ता असलेल्या व्यक्तींवर २% संपत्ती कर आणि त्याच उंबरठ्यावरील मालमत्तेवर ३३% वारसा कर प्रस्तावित करून पिकेट्टी म्हणाले, "भारताने श्रीमंतांवर कर लावण्यात सक्रिय असले पाहिजे. त्यांच्या अंदाजानुसार, या उपाययोजनांमुळे भारताच्या जीडीपीच्या २.७३% बरोबर वार्षिक अतिरिक्त महसूल मिळू शकेल. भारतातील सर्वात श्रीमंतांमधील संपत्तीचे केंद्रीकरण श्रीमंत राष्ट्रांच्या तुलनेत जास्त झाले आहे. २०२४ च्या जागतिक असमानता प्रयोगशाळेच्या अहवालाचा दाखला देत त्यांनी सहलेखन केले, पिकेट्टी यांनी उघड केले की भारतातील शीर्ष १% लोकसंख्या २२.६% राष्ट्रीय उत्पन्नावर आणि ४०.१% देशाच्या संपत्तीवर नियंत्रण ठेवते, जी युनायटेड स्टेट्स आणि ब्राझीलपेक्षा जास्त आहे. या एकाग्रतेला भारतातील उच्चभ्रू लोकांमध्ये नशीब वाढल्यामुळे चालना मिळाली आहे. फोर्ब्सच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षभरात, भारतातील १०० अब्जाधीशांची संचित ◀◀ पान २ वर

### जास्त करांमुळे भांडवल बाहेर पडेल

भारताने २०१५ मध्ये संपत्ती कर रद्द केला आणि तो पुन्हा सुरू करण्याच्या कॉलला विरोध केला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी वारसा कराच्या विरोधात युक्तिवाद केला आहे, मध्यमवर्गावरील संभाव्य ओझे नमूद केले आहे. मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंथा नागेश्वरन यांनी याच कार्यक्रमात ही भावना प्रतिध्वनीत केली आणि चेतावणी दिली की जास्त करांमुळे भांडवल बाहेर पडू शकते.

cmyk

अग्रलेख

# भारतीय संविधानाचे मंथन स्वागतार्हेच

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने लोकसभेत सुयोग्य चर्चा झडली. भारताची समर्पित घटना तेव्हाही कोणत्या देवाला किंवा शक्तीला समर्पित नव्हती आणि भविष्यातही ती असणार नाही अशी आशा भारत बाळगून आहे. संविधानाची ही शक्ती कधी क्षीण झाल्यासारखी वाटते तर कधी अचानकच नकळतपणे ती झळाळून उठते. ७५ वर्षांत अनेकदा घटनेबद्दल चिंता व्यक्त करून सुद्धा ती अबाधित आहे. याबद्दल घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे, भारतीय घटनेसाठी चिंता आणि चिंतन करून ज्यांनी त्याला एक भक्कम स्वरूप प्राप्त करून दिले त्यांचे या निमित्ताने ऋण व्यक्त करणे आवश्यक आहे. या देशातील अडाणी माणसांनी मतदान करून या देशाची लोकशाही आजपर्यंत जिवंत आणि जागृत ठेवलेली आहे. सत्ताधारी जरी बहुमताने ठरत असला तरी देशाचे जनमन मात्र केवळ बहुमताला मानत नाही. संत तुकारामांच्या म्हणण्याप्रमाणे, 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' ही भारतीय विचाराची झेप आहे. 'सत्यमेव जयते' ही त्या विचाराची शक्ती आहे. त्या विचाराने भारतीय घटना निर्माण होण्याच्या पूर्वीच इथे एक व्यवस्था निर्माण होईल अशी प्रदीर्घ पार्श्वभूमी तयार करून ठेवली होती. भारताच्या हजारो वर्षांच्या वाटचालीतून जो विचार प्रवाहित होत आला आणि ठिकठिकाणी त्या प्रचंड प्रवाहाला काहींनी जाणतेपणाने अडथळे निर्माण केले, काहींनी त्याला वळण दिले आणि काहींनी त्याच्या निर्मलतेची जबाबदारी पार पाडली त्या सर्वांच्या विविध मार्गांचे एकत्रीकरण म्हणजे स्वतंत्र भारताची घटना आहे.

ही घटना एकाच वेळी लोकशाहीवादी आणि सर्वसमावेशक आहे त्याचवेळी ती एकेका व्यक्तीचा आणि त्याच्या स्वातंत्र्याचाही विचार करणारी आहे. काही वेळा या घटनेत कालानुरूप दुरूस्ती ही करावी लागते आणि बहुमताने दुरूस्तीची परवानगीही घटना देते. एका अर्थाने घटना स्वत:लाच प्रवाही राखण्याचा सातत्याने प्रयत्न करते. या काळात घडलेल्या घडामोडींचा परामर्श म्हणजे लोकसभेत शनिवारी झालेली चर्चा होती. सत्ता आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी जे उद्गार काढले त्याचा विचार केला तरी या वाटचालीकडे पाहणे सोयीचे होईल. पंतप्रधानांनी काँग्रेसवर टीका करताना भारतीय राज्यघटनेला त्यांनी राजकारणाचे हत्यार बनवले असा आरोप केला. भाजपने केलेल्या घटनादुरूस्तीला त्यांनी देशाच्या उज्वल भविष्यासाठी असल्याचे आणि त्यातून देशाचे ऐक्य मजबूत केल्याचे दावे केले. राहुल गांधी यांनी पंतप्रधानांच्या आधी भाषण करताना मोदी आणि त्यांच्या पाठीमागे असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला देशात मनुस्मृती पुन्हा आणायची आहे अशी टीका केली. त्याचा दाखला देताना त्यांनी सावरकरांचे मत पुढे केले. शिवाय गुरूदक्षिणेत एकलव्याचा अंगठा कापून घेणाऱ्या द्रोणाचार्यांप्रमाणे केंद्रातील भाजप सरकारने देशातील तरूण, दलित, आदिवासी, मागासवर्गीय, शेतकरी व कामगारांचा अंगठा कापून घेतला आहे. धारावी अदानींना देऊन तिथल्या छोट्या उद्योजकांचा अंगठा कापून घेतला जात आहे. देशातील सर्वसामान्य माणसांची शक्ती क्षीण करत आहेत. नोकऱ्यांत थेट भरती, परीक्षेत घोटाळे, अग्निवीर योजना, शेतकऱ्यांचे हाल, दलित मुलीवर अत्याचार हे या सर्व घटकांचा अंगठा सरकारने कसा कापला हे दाखवून देणारे आहे. जातनिहाय जनगणना करून ५० टक्के आरक्षणाची भिंत आम्ही तोडून दाखवू, भारताला राजकीय सामाजिक आणि आर्थिक समानतेनंतरच घटना प्रस्थापित होऊन नव्या पद्धतीचा विकास आणि नवे राजकारण साकारू शकेल अशी आशा व्यक्त केली. देशात सामाजिक आणि आर्थिक समानता नसेल तर राजकीय समानता नष्ट होईल असे आंबेडकर म्हणाले होते, आज ती समानता राहिली नाही आणि गरिबांचे रक्षण करणाऱ्या घटनेवर भाजपकडून २४ तास हल्ले चढवले जात आहेत. आपणासह देशातील विरोधी पक्ष ते प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही असे ते म्हणाले. घटनेवर बोलणाऱ्या या दोन्ही शक्तींचा पूर्व इतिहास देशाला माहित आहे. त्यामुळे त्यावर अधिक भाष्य न करता त्यांच्या वक्तव्यातून घटना सुदृढ राखण्याचे आणि स्वत:चा विचार पुढे नेण्यासाठीचे मनसुबे देखील उघड झाले आहेत. भारतीय घटना चिरायू व्हायची तर त्यासाठी हे उलट सुलट विचार मांडले जाणे आणि त्याचे मंथन होणे अपेक्षित होते. ते झाले हे महत्त्वाचे.

## बीड येथील घटना गंभीर; प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीर्याने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**



विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी २८९ अन्वये उपस्थित केलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी 'सीआयडी'ची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यांस सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धर्माचा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## पॅलेस्टाईनचा उल्लेख असलेली पिशवी घेऊन प्रियांका गांधी संसदेत; भाजपाने साधला निशाणा

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**काँग्रेस खासदार प्रियांका गांधी वाड्रा सोमवारी खास बॅग घेऊन संसदेत पोहोचल्या. ज्यावर 'पॅलेस्टाईन' असे लिहिले होते. ही बॅग पॅलेस्टाईनला त्यांचा पाठिंबा आणि गाझामधील इस्रायलच्या लष्करी कारवाईविरोधातील त्यांची भूमिका दर्शवत होती. प्रियंका गांधी यांनी यापूर्वीही अनेकदा पॅलेस्टिनींच्या समर्थनार्थ आवाज उठवला आहे. पॅलेस्टाईनला पाठिंबा दिल्याबद्दल भाजपने प्रियंका गांधींना धारेवर धरले.**



प्रियंका गांधींच्या बॅगेवर इंग्रजीत 'पॅलेस्टाईन' लिहिलेले होते आणि पॅलेस्टाईनशी संबंधित चिन्हेही होती, ज्यात टरबूजाचे चित्र होते. हे टरबूज पॅलेस्टिनी लोकांच्या संघर्षाचे आणि एकतेचे प्रतीक मानले जाते. गेल्या आठवड्यात नवी दिल्लीतील पॅलेस्टिनी दूतावासाचे प्रमुख अबिद अलराझाक अबू जझार यांनी प्रियंका गांधी यांची भेट घेतली. केरळमधील वायनाड येथून अलीकडेच झालेल्या निवडणुकीतील विजयाबद्दल त्यांनी प्रियंकाचे अभिनंदन केले होते. प्रियंका गांधींच्या या कृत्याला भाजपने तीव्र विरोध दर्शवला. भाजप खासदार गुलाम अली खटाना यांनी याला 'मथळे मिळवण्याचा प्रयत्न' म्हटले आहे. ते म्हणाले, ''जनतेने त्यांना नाकारले की ते असे प्रकार करायला लागतात.'' प्रियंका गांधी यांनी भाजपच्या आरोपांवर प्रत्युत्तर देताना सांगितले की, बांगलादेशात हिंदू आणि ख्रिश्चनांवर होत असलेल्या अत्याचारांवरही सरकारने चर्चा करावी. त्या म्हणाल्याख ''बांगलादेशातील अल्पसंख्याकांवरील अत्याचाराचा मुद्दा सरकारने उपस्थित करून पीडितांना पाठिंबा द्यावा.

## मोटारसायकल चोरांची आंतरजिल्हा टोळी अंबाजोगाई जेरबंद; १९ मोटारसायकल जप्त

अंबाजोगाई । प्रतिनिधी

गुप्त माहितीच्या आधारे बीड जिल्हा पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अंबाजोगाईत सापळा लावून मोटारसायकल चोरांच्या आंतरजिल्हा टोळीचा पर्दाफाश केला. यावेळी चोरट्यांकडून १९ मोटारसायकलसह जवळपास ९ लाख मुद्देमाल जप्त केला. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दाखल चोरीच्या गुन्ह्यातील मोटारसायकल वीरसिंग शेरसिंग गोके (रा. सा.बां. कार्यालय जवळ, सदर बाजार रोड, अंबाजोगाई) याने चोरली असून तो चोरीच्या गाड्या विक्री करण्यासाठी चनई रोडवरील सीताफळ संशोधन केंद्राजवळ येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेस मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे पोलीस निरिक्षक उस्मान शेख यांनी त्या परिसरात सापळा रचला. यावेळी पोलिसांना पाहताच पळून जाण्याच्या बेतात असणाऱ्या वीरसिंगला पोलिसांनी पाठलाग करून पकडला. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने घरात लपवलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांना दाखवल्या. तसेच, त्याने गाडी विकताना फायनान्सची असल्याचे कारण भासवुन कागदपत्र नंतर देतो असे सांगत आठ मोटारसायकल विकल्या होत्या. पोलिसांनी या सर्व १८ मोटारसायकल जप्त केल्या. पोलीस वीरसिंगच्या इतर साथीदारांचा शोध घेत आहेत. ही कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांचे मार्गदर्शनाखाली, पीएसआय सुशांत सुतळे, पोलीस कर्मचारी मारुती कांबळे, बाळकृष्ण जायभाये, विकास राठोड, विष्णु सानप, देविदास जमदाडे, निलेश ठाकुर, मच्छिंद्र बीडकर, सचिन आंधळे, अश्विनकुमार सुरवसे व चालक नितीन वडमारे यांनी केली.

## अंमळनेर शाळेचे शिक्षक केंद्रे अतिथींचा भगवद गीता ग्रंथ सप्रेम भेट देऊन करतात सन्मान

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

अंमळनेर येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री.गणेश विद्यामंदिरात श्री. रामनाथ पोकळे अमरावती परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक तथा अंमळनेरचे भूमिपुत्र यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात गीता जयंतीचे अवचित्य साधून शाळेचे शिक्षक अनिल केंद्रे सर यांनी कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांना त्यांच्यामार्फत स्वखर्चाने भगवद्? गीता ग्रंथ सप्रेम भेट दिला.केंद्रे सर हे शाळेत कोणतेही कार्यक्रम झाले तर प्रमुख अतिथी,मान्यवरांचा भगवद्? गीता ग्रंथ भेट देऊन सत्कार करतात.त्यांचा हा धार्मिक वृत्ती जोपासण्याचा उपक्रम खरोखरच सर्वांसाठी प्रेरणा देणारा तसेच कौतुकास्पद आहे.या कार्यक्रमाला अंमळनेर पोलीस स्टेशनचे स.पो.नि.भार्गव सपकाळ, माजी सरपंच मुरलीधर पवार, उद्धवशेठ पवार,ग्रा.प.सदस्य प्रल्हाद पोकळे,ट्रेनी शिक्षक राहुल बेदरे, पत्रकार बबनराव उकांडे,गोवर्धन जाधव,भाऊसाहेब पवार,अविराज पवार आदीसह मुख्याध्यापक हाके सर,जाधवर सर सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.





## धम्मगिरी महादेव डोंगर येथे पौर्णिमा साजरी

**अंबड । प्रतिनिधी**

१५ डिसेंबर रविवारी रोजी धम्मगिरी येथे कालकथित आण्णासाहेब खरात यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ धम्मगिरी चॅरिटेबल ट्रस्ट अंबड चे सदस्य आयु. नागसेन आण्णासाहेब खरात यांच्या वतीने नेहमीप्रमाणे धम्मगिरी महादेव डोंगर परिसर अंबड येथे खीरदान व भोजनदान करून पौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी मलिंद भणते, बाबासाहेब खरात, नागसेन खरात, मुन्ना खरात, शाहुल खरात, बाळू शहाणे, संदीप खरात, सचिन खरात, धमचारी उपयबोधी, गुलाब भानव, सेवानिवृत्त मंडळाधिकारी शिवाजी गाढेकर , उघडे सर, घायतडक सर, गायकवाड साहेब, बंटी अंकल खरात, तुळशिराम खरात, पंचशील महिला मंडळ सर्व बौद्ध उपासक, उपासिका, बालक बालिकांची उपस्थिती होती.

## ग्राहकांच्या हितासाठी दाढी, कटींगचे दर वाढवणार नाहीत–मधुकर सुरवसे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दरवर्षीच वाढत्या महागाईमुळे दरवाढ करण्याचा प्रघात आहे. असे असताना ही केवळ ग्राहकांना आर्थिक भुर्दंड नको म्हणून दरवाढ न करण्याचा निर्णय नाभिक बांधवांनी आयोजित बैठकीत घेतला असल्याची माहिती राष्ट्रीय नाभिक एकता महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे यांनी दिली आहे.**

शहरातील गजराई कॉम्प्लेक्स येथे नुकतीच नाभिक समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी सलूनचे दर वाढवावेत का..? याबाबत चर्चा झाली. उपस्थितांपैकी अनेकांनी दरवाढ करू नये असे आपले मत लेखी स्वरूपात नोंदवले. या चर्चेत सर्वानुमते महागाईच्या झळा आज प्रत्येक क्षेत्राला जाणवत आहेत. तरी परंतु, केवळ ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागू नये म्हणून सलूनच्या सेवांचा खर्च न वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. नाभिक बांधव आणि सलून व्यावसायिक जनतेला हेअर कट, दाढी, क्लिन अप, फेशियल, मसाज, स्मुथनिंग, हेअर ट्रिटमेंट, हेअर कलर, हेड मसाज, मेनिक्यूअर, पेडिक्यूअर अशा विविध प्रकारच्या मेकअप या सेवा देतात. जनतेकडून ही नाभिक बांधवांना वेळोवेळी सहकार्य करण्यात येते. त्यामुळे अंबाजोगाईत मात्र सध्या तरी सलूनचे दर हे पुर्वी प्रमाणेच कायम राहणार आहेत. नाभिक बांधवांच्या या निर्णयामुळे सर्वसामान्य ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. तसे तर दाढी–कटींग व इतर सलून सेवांसाठी नव्या दरांची अंमलबजावणी ही नवीन वर्षांपासून होत असते. परंतु, अंबाजोगाईतील नाभिक समाज बांधवांनी या बाबत बैठक घेऊन सर्वानुमते दर न वाढवता पुर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याचा घेतलेला निर्णय हा अभिनंदनीय आहे. याबाबत अधिक माहिती देताना राष्ट्रीय नाभिक एकता महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे यांनी सांगितले की, मागील काही महिन्यांपासून जागतिक स्तरापासून ते देशात महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा फटका सलून व ब्युटी पार्लर व्यवसायालाही बसला आहे. या व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. त्यातच जीएसटी, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, दुकानांचे भाडे, वीज बील, कारागिरांचा पगार, इतर आवश्यक खर्च आदींसारख्या आर्थिक विवंचनेत सलून व्यावसायिक अडकला आहे. त्यामुळे दरवाढ करण्याची मागणी काही सलून व्यावसायिकांकडून करण्यात येत होती. इतर शहरांतून दाढी–कटींग व इतर सलून सेवांसाठी नव्या दरांची नववर्षापासून म्हणजे १ जानेवारी २०२५ पासून अंमलबजावणी ही होणार आहे, तरी परंतु, अंबाजोगाईतील नाभिक समाज बांधवांनी याबाबत बैठक घेऊन सर्वानुमते दर न वाढवता पुर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाबद्दल मी नाभिक समाज बांधवांचे आभार मानतो व कौतुक ही करतो. त्यामुळे सध्या तरी अंबाजोगाई तालुक्यातील सर्वसामान्य ग्राहकांना दाढी, कटींगसाठी जास्तीचे पैसे मोजावे लागणार नाहीत असे तालुकाध्यक्ष सुरवसे म्हणाले. या बैठकीस राष्ट्रीय नाभिक एकता महासंघाचे अंबाजोगाई तालुकाध्यक्ष मधुकर सुरवसे, शहराध्यक्ष अजिंक्य राऊत, नाभिक समाज कर्मचारी संघटना तालुकाध्यक्ष डॉ.केशव राऊत, माणिकराव हरणे, श्रीहरी गवळी, योगेश काळे, कृष्णा लोखंडे, अशोक वाघमारे, माऊली चोपडे, महादेव गवळी, जगन्नाथ बिडवे, परमेश्वर गवळी, माधव कांबळे, राजेभाऊ जाधव, विष्णू कचरे, प्रवीण सुरवसे, दिलीप कांबळे, गोविंद कचरे, अभिषेक गवळी, विठ्ठल शिंदे, भाऊसाहेब गवळी, विश्वजीत कचरे, दत्ता गोरे, ओंकार मोहिते, योगेश गायकवाड, राज काळे, संतोष कांबळे, शरद शिंदे, भागवत राऊत, गणेश शिंदे, दिलीप सूर्यवंशी, पिंटू सूर्यवंशी, गणेश झगडे, जितेश काळे, नवनाथ धाकतोडे, गणेश गोरे, राजूभाऊ राऊत, संदेश काळे, सतीश सावंत, गणेश घोडके, संतोष सावंत, लिंबराज गवळी, राहुल गवळी, रामेश्वर राऊत, अमित चव्हाण, सचिन आपटे, उमेश कचरे, बालाजी वाघमारे, दत्ता लोखंडे, रवी काळे, शिवराम काळे, संभाजी सावंत, विष्णू कांबळे, विलास काळे, ज्ञानेश्वर दळवी, अंगद राऊत, चंद्रकांत सुरवसे, राजेभाऊ राऊत, रवी लोखंडे, गोपाळ कचरे, विकास कचरे, उमेश दळवी, हनुमंत राऊत, नितीन शिंदे, अमोल पंडित, संतोष गवळी, आश्रुबा वाईंगडे, जीवन इंगळे, उत्तरेश्वर सुरवसे, सोमेश्वर काळे, अमर शिंदे, भाऊसाहेब सुरवसे, ओमकार माने, रमाकांत मोरे, भारत सुरवसे, शिवाजी मोरे, सुभाष साळुंके, अमृत मोटेगावकर, दादासाहेब सावंत, शुभम कचरे, रमेश गवळी, सुभाष राऊत, विजय राऊत, अजिंक्य राऊत, समाधान राऊत, अभिषेक सुरवसे, हरिभाऊ शिंदे, गणेश सूर्यवंशी, अशोक दळवी, विवेक गवळी, अंकुश गवळी, बालाजी कोथळे, बालाजी कचरे, वैभव राऊत, अशोक शिंदे, कैलास शिंदे, गणेश काळे, ईश्वर घोडके, पांडुरंग कचरे, संभाजी राऊत, उद्धव राऊत, विजय गवळी, भास्कर हरणे, बालाजी हरणे आदींसह समाज बांधव व सलून व्यावसायिक उपस्थित होते.



## पान १ वरून...

### देशभरात सोयाबीन

सुरु झाल्यानंतर सोयाबीनचे भाव ४ हजार २०० रुपयांच्या दरम्यान होते. नेमक्या याच काळात विधानसभेच्या निवडणुका होत्या. त्यामुळे सरकारने घाईगडबडीने सहा राज्यांमध्ये हमीभावाने सोयाबीनची खरेदी जाहीर केली. मात्र सरकारने खरेदी जाहीर केल्यानंतर सुरुवातीचे महिनाभर १२ टक्के ओलावा असलेले सोयाबीन खूपच कमी प्रमाणात होते. कारण एकतर यंदा लागवडी उशीरा झाल्याने काढणी उशारा झाली. दुसरे म्हणजे काढणीच्या काळात पाऊसही झाला. यामुळे सोयाबीनमध्ये ओलावा जास्त आला. सोयाबीनमध्ये ओलावा जास्त असल्याने खरेदी केंद्रांवर नाकारले जात होते. सरकारने जाणून बुजून सोयाबीन खरेदीची गती वाढवली नाही. कारण सरकारने खरेदीचे उद्दीष्ट जाहीर केले तरी प्रत्यक्ष मानसिकता वेगळीच आहे, अशी टिका शेतकरी करत आहेत. शेतकऱ्यांची ही शंका खरी दिसत आहे. कारण देशभरात आतापर्यंत उद्दीष्टाच्या केवळ १२ टक्केच खरेदी झाली. सरकारने ३३ लाख ६० हजार टन खरेदीचे उद्दीष्ट ठेवले. मात्र आतापर्यंत केवळ ४ लाख १५ हजार टनांचीच खरेदी झाली. यावरून सरकारला खरेदी पूर्ण करायची नाही, हे स्पष्ट होते.

----------

### बीड, परभणी मुद्द्यांवर

यांची अत्यंत निघृण पद्धतीने हत्या करण्यात आल्यानंतर पोलीस सक्रीय झाले. भाजपा सरकार आल्यानंतर दलित व बहुजन समाजावर अत्याचार केले जात आहेत का? ईव्हीएम सरकारने राज्यात राजकीय हत्यासत्र सुरु केले आहे का? असे प्रश्न पटोले यांनी उपस्थित केले. नाना पटोले पुढे बोलताना म्हणाले की, परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांना कोठडीत असताना पोलिसांनी प्रचंड हालहाल करून मारण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे शवविच्छेदन अहवालात स्पष्ट झाले असून ही सरकार प्रायोजीत हत्या आहे. याप्रकरणी सरकारवरच हत्येचा गुन्हा दाखल केला पाहिजे अशी मागणीही त्यांनी केली. परभणीच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, संविधानाची विटंबना केल्याप्रकरणी पवार नावाच्या इसमाला पोलिसांनी अटक केली असून तो मनोरुग्ण असल्याचे सांगितले जाते. परंतु तो व्यक्ती बांग्ला देशातील हिंदूवरील अत्याचार प्रकरणी काढण्यात आलेल्या मोर्चात सहभागी झाला होता. सरपंच संतोष देशमुख सुद्दा हिंदूच आहे, त्यांचे हातपाय कापले, मृत्यूनंतर त्यांच्या शरिरावर आरोपी नाचले, त्यांना काय म्हणणार. बांग्ला देशातील हिंदू सुरक्षित नाहीत म्हणता मग भारतातील हिंदुंच्या संरक्षणाचे काय, असा सवाल करत परभणी व बीडचे प्रकरण मारकडवाडीच्या ईव्हीएम विरोधातील मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न तर नाही ना अशी शंका येते असा आरोपही महायुतीवर केला. विधानसभेच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीच्या आमदारांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर आंदोलन केले. ईव्हीएम हटाव व परभणी तसेच बीडच्या मुद्द्यांवर यावेळी सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

---------

### शिवसेना शिंदे गटात

(८ कॅबिनेट व १ राज्यमंत्री) समावेश आहे. जुन्या १६ मंत्र्यांना पुन्हा संधी देण्यात आली, तर १९ नवे चेहरे घेण्यात आले आहेत. १२ जणांना वगळण्यात आले आहे. मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांची संख्या ४२ झाली. फक्त १ जागा रिक्त आहे. मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या पवनी विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांना मंत्रिपद न मिळाल्याने त्यांनी उघड नाराजी व्यक्त केली. तसेच त्यांनी आपल्या शिवसेना उपनेते पदाचा राजीनामा देखील दिला. ज्यांचे पक्षात काहीच योगदान नाही अशांना देखील मंत्रिपद मिळाले, ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, त्यांना देखील मंत्रिपद मिळाले, जर मला जनतेला न्याय देता येत नसेल तर पदावर राहून काय उपयोग असा सवाल नरेंद्र भोंडेकर यांनी केला आहे. भोंडेकर यांच्याप्रमाणाचे विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे, दीपक केसरकर आणि तानाजी सावंत हे देखील नाराज असल्याची चर्चा आहे, विजय शिवतारे यांनी उघड नाराजी व्यक्त केली आहे. विश्वासात न घेता मंत्रिमंडळ विस्तार झाला, आता आडीच वर्षांनी जरी मंत्रिपद मिळाले तरी मी घेणार नाही असे त्यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे प्रकाश सुर्वे देखील नाराज आहेत. तानाजी सावंत यांच्याकडे गेल्यावेळी आरोग्य खाते होते. मात्र यावेळी त्यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळाला आहे. त्यामुळे ते नाराज असल्याची माहिती समोर येत आहे. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला न थांबता ते पुण्यातील बालाजी नगर येथील कार्यालयात परतले आहेत. माध्यमांसमोर येण्यासाठी तानाजी सावंत यांनी नकार दिला आहे. आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आमदारांची नाराजी कशी दूर करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

----------

### माझ्यासोबत कोणाचीच चर्चा नाही

काही चर्चा झालीच नसल्याचे मुनगंटीवार यांनी सांगितले आहे. मंत्रिपद नाकारल्यानंतर सुधीर मुनगंटीवार हे नाराज झाले आहेत. त्यांनी मनातली खंतसुद्धा बोलून दाखवली. मुनगंटीवारांच्या नाराजीनंतर फडणवीस यांनी म्हटले की, मंत्रिमंडळ विस्तारावर आपण मुनगंटीवार यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. मंत्रिपद मिळाले नसेल तर त्यांच्यासाठी पक्षाकडून मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते. देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिपदाबाबत प्रदीर्घ चर्चा झाल्याचा केलेला दावा सुधीर मुनगंटीवार यांनी मात्र फेटाळून लावला आहे. मुनगंटीवार यांनी म्हटले की, आमच्यात प्रदीर्घ अशी कोणतीही चर्चा झाली नाही. मंत्रिमंडळ विस्ताराच्या आदल्या दिवशी सकाळी फक्त बोलले होते. मात्र त्यावर आमच्यात प्रदीर्घ अशी चर्चा झाली नाही. देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी माझे नाव मंत्रिपदासाठी असल्याचे आदल्या दिवशी सांगितले. पण वरिष्ठांकडून निरोप आल्यास यादीतले चार पाच लोक कमी होतील असेही मला बावनकुळेंनी सांगितले होते अशी माहिती सुधीर मुनगंटीवार यांनी दिलीं.

-------------

### तानाजी सावंतांनी

नावही काढले आहे. त्याऐवजी, नवीन प्रोफाईल ठेवण्यात आले असून या नव्या प्रोफाईल फोटोमध्ये फक्त शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो दिसून येत आहे. तसेच, शिवसेना चिन्ह असलेल्या फोटोच्या जागी शिवसैनिक उल्लेख असलेला बाळासाहेबांचा फोटो लावल्याचे पाहायला मिळत आहे.

--------

### नाराज छगन भुजबळ

नाराजी लपून राहिलेली नाही. भुजबळांनी कमी शब्दात आगामी काळातील आपल्या राजकारणाची दिशा दाखवून दिली आहे. त्यामुळे भुजबळ काय निर्णय घेणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. छगन भुजबळ यांच्या नाराजीच्या चर्चा सुरू झाल्या आणि त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून छगन भुजबळ यांची दखल घेत थेट त्यांना राज्यसभेवर पाठवण्याची तयारी पक्षाकडून सुरू असल्याची माहिती दिली. पक्षाकडून ही देखील बाब सांगण्यात आली होती की, छगन भुजबळ यांचीच इच्छा होती की, आपण राज्यसभेवर जायला हवे आणि त्यासाठीच हा निर्णय घेतला असल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, छगन भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून देण्यात आलेला प्रस्ताव नाकारल्यानंतर पहिल्याच दिवशी अधिवेशनात हजेरी लावून थेट नाशिकला जाणे पसंद केले. यावेळी माध्यमांशी संवाद साधताना मी नाराज आहे. पुढे काय? ज्यांनी मला डावलले त्यांना तुम्ही प्रश्न विचारायला हवेत, असे त्यांनी म्हटले. तर ते आता समता परिषदेच्या कार्यकर्त्यांना भेटणार असून आगामी काळात आपण काय भूमिका घ्यायला हवी याबाबत चर्चा करणार आहेत. त्यामुळे आता छगन भुजबळ काय निर्णय घेणार? हे येत्या काळात स्पष्ट होणार आहे.

------------

### स्व.संतोष देशमुख हत्याप्रकरणी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील दिवंगत सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून अतिशय अमानवीय, क्रूर दि.९ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आली आहे. अतिशय किरकोळ कारण असताना गुन्हेगारी प्रवृत्ती असलेल्या आणि बीड जिल्ह्यांश सत्ताधाऱ्यांचा राजाश्रय असलेल्या नराधमांनी हे कुकर्म केले आहे. स्व.देशमुख यांचे अपहरण झाले तेव्हा त्यांचे लहान बंधू यांनी केज पोलीस स्टेशन ला जाऊन सदरील घटनेची माहिती दिली तरीही तेथील पोलिसांनी वेळ वाया घालवत कुठलीही कारवाई न करता त्यांना तिथे बसवून घेतले. या वेळेत स्व.देशमुख यांचा जीव वाचला असता. पोलिसांनी जाणीवपूर्वक आरोपीना हे कृत्य करण्यासाठी सहकार्य केले होते काय असाही संशय या प्रकरणात येत आहे. स्व.देशमुख यांची हत्या इतक्या हैवानतेने करण्यात आली आहे कि, त्याची कल्पनाही अत्यंत क्लेशदायक आहे. एवढे गंभीर प्रकरण असतानादेखील याप्रकरणातील मुख्य आरोपी अजूनही मोकाट आहेत. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाविकास आघाडीतील आमदारांसह विधिमंडळा परिसरात आंदोलन केले.

-------------

### मारहाणीमुळेच सूर्यवंशीचा

आला आहे. या रिपोर्टमध्ये मृत व्यक्तीच्या अंगावर मारहाणीच्या अनेक खुणा स्पष्टपणे दिसत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. यामुळे वातावरण अधिकच तापले आहे.

----------

### महाराष्ट्राला तीन आठवड्यांपासून

स्थानकाबाहेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची काही दिवसांपूर्वी विटंबना झाली होती. यानंतर उफाळेल्या हिंसाचारप्रकरणी काही जणांना ताब्यात घेण्यात आले होते. यातील सोमनाथ सूर्यवंशी या तरुणाचा न्यायालयीन कोठडीतील मृत्यू झाला आहे. तर बीडच्या केज तालुक्यातील मस्सनजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची जुन्या वादातून अपहरण करून हत्या करण्यात आली आहे. या दोन्ही प्रकरणामध्ये नेमकं काय झाले याचे उत्तरं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी द्यावे, अशी मागणी यावेळी त्यांनी केली. सुप्रिया सुळे पुढे बोलताना म्हणाल्या की, देवेंद्र फडणवीस यांनी या आधीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून काम केले आहे. त्यामुळे बीड आणि परभणीमधील विषय त्यांनी गांभीर्याने घ्यावेत. राज्याला आणि देशाला पारदर्शकपणे कळले पाहिजे, परभणीत तरुणाचा मृत्यू झाला कसा. या आठवड्यात दोन–तीन घटना झाल्या आहेत. बीड आणि परभणीतील घटना घडलेल्या असताना राज्याला गृहमंत्री नाही. सरकार होऊन तीन आठवडे झाले आहेत. महाराष्ट्राच्या मायबाप जनतेने त्यांना बहुमताने विजयी केले आहे. त्यामुळे मला अपेक्षा होती, ते आतापर्यंत कामाला लागले असतील, असा टोला त्यांनी यावेळी लगावला. परभणी किंवा बीडमध्ये घटना घडत असताना राज्याचा एकही प्रतिनीधी त्या ठिकाणी गेला नाही. तसेच लोकांना शांततेचे आवाहन केले नाही. असे त्या म्हणाल्या.

----------

### भारतात विषमतेची पातळी

संपत्ती ३०० अब्जाहून अधिक वाढून १.१ ट्रिलियनपर्यंत पोहोचली आहे, जी मोठ्या प्रमाणावर शेअर बाजारातील रॅलीमुळे चालते. संपत्ती असमानता आणि करप्रणालीवरील वादविवाद तीव्र होत असताना, पिकेट्टीच्या कॉलने आर्थिक असमानता संबोधित करणे आणि आर्थिक वाढीचे संरक्षण यांच्यातील वाढता तणाव अधोरेखित केला आहे.

-----------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४



## तबल्याचा ताल हरपला; झाकीर हुसेन यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

नागपूर : प्रसिद्ध तबलावादक उस्ताद झाकीर हुसेन यांच्या निधनाने तबल्याचा ताल हरपला आहे. तबल्याच्या नादमाधुर्याने सबंध जगातील रसिक श्रोत्यांना एका समेवर आणणारा महान सुपुत्र आपण गमावला आहे, अशा शोकसंवेदना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या. महाराष्ट्राचा सुपुत्र असलेल्या झाकीर हुसेन यांनी अवघ्या जगाला तबल्याचे वेड लावले. तीन पिढ्यांसोबत तबल्याची जुगलबंदी सादर करणारे झाकीर हुसेन यांनी अनेक युवकांना तबला वादनाकडे आकर्षित केले. तबला क्षेत्रात भारताची वेगळी ओळख त्यांनी जगात निर्माण केली. तबलानवाज पद्मविभूषण उस्ताद झाकिर हुसेन आणि तबला हे अद्वैत होते. हे अद्वैत आता भंगले आहे. जादुई बोटांनी त्यांनी स्वरमंडलात उभे केलेल्या अनेक अद्भुत मैफिली यापुढे तालयोगी तबलानवाझ उस्ताद झाकिर हुसेन यांच्याविना सुन्यासुन्या वाटत राहतील. वयाच्या सातव्या वर्षापासून तबलावादनाची सुरुवात करणाऱ्या उस्ताद झाकिर हुसेन यांनी तबलावादनातील एकल मैफिलींनाही प्रतिष्ठा मिळवून दिली. भारतीय संगीताला जागतिक पातळीवर सन्मान मिळवून देण्यात हुसेन यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे शिष्य जगभर संगीताची सेवा करत आहेत. वडिलांकडून मिळालेला संगीताचा वारसा त्यांनी केवळ जोपासलाच नाही तर तबलावादनाला अत्युच्च अशा शिखरावर नेले. गाणारा तबला ही त्यांच्या जादुई बोटांची करामत अनेकांनी अनुभवली आहे. ज्येष्ठ कलाकारांबरोबर केलेली जुगलबंदी रसिकांसाठी पर्वणी होती. तरूण आणि होतकरू कलाकारांना व्यासपीठ मिळावे,

# पिढी बदलायची असेल तर समाज साक्षर व्हायला पाहिजे- तहसीलदार विलास तरंगे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आजची किंवा येणारी पिढी बदलायची असेल तर समाज साक्षर व्हायला पाहिजे असे मत अंबाजोगाई तालुक्याचे तहसीलदार विलास तरंगे यांनी व्यक्त केले. ते केंद्र शासन व महाराष्ट्र शासन पुरस्कृत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग तथा शिक्षणाधिकारी (योजना) बीड आणी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमा अंतर्गत तालुकास्तरीय उल्लास मेळावा अंबाजोगाई २०२४-२५ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात तहसीलदार विलास तरंगे हे बोलत होते. अंबाजोगाई शहरातील मोदी लर्निंग सेंटरच्या बी- फार्मसी महाविद्यालयात हा मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमात मेळाव्याचे उद्घाटक म्हणून प्रमुख तहसीलदार विलास तरंगे,तर प्रमुख पाहुणे म्हणून विस्तार अधिकारी अधिकारी श्रीमती मुमताज पठाण, डॉ योगेश कुलकर्णी, संयोजक श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्राचार्य आर रामचंद्रन , प्राचार्य तरके , प्राचार्य विनायक मुंजे ,जगदीश जाजू हे उपस्थित होते.

या मेळाव्याची सुरुवात दीपप्रज्वलन व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. केंद्र प्रमुख रामभाऊ पवार यांनी स्वागतगीत गायले. या मेळाव्याचे प्रास्ताविक नांदूरकर सरांनी केले. हा उल्लास नवभारत साक्षरता उपक्रम हा केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबवला जात असल्याचे सांगितले. जिल्ह्यातून निरक्षरता हटवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्यानेच शासन असे अभियान चालवत असून या अभियानास जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक देखील प्रयत्नशील असून लवकरच बीड जिल्ह्यास दिलेले टार्गेट पूर्ण करतील असेही नांदूरकर यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले आहे. डॉ योगेश कुलकर्णी यांनी देखील याप्रसंगी आपले मनोगत मांडले. इतर जिल्ह्याच्या तुलनेत बीड जिल्हा हा सक्षरतेमध्ये अग्रेसर असल्याचे डॉ योगेश कुलकर्णी यांनी सांगितले. त्या त्या गावातील तलाठ्यांच्या माध्यमातून साक्षरता जागरूकता करण्यास



### मोदी लर्निंग सेंटरच्या बी फार्मसी महाविद्यालयात तालुकास्तरीय उल्लास मेळावा २०२४-२५ संपन्न

प्रवृत्त करावे अशी मागणी डॉ देशपांडे यांनी तहसीलदार तरंगे यांच्याकडे केली.

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांनीदेखील याप्रसंगी आपले विचार समोर ठेवले. त्यांनी देखील आपल्या जिल्ह्यातील साक्षरता वाढवण्यासाठी आपल्या संस्थेच्या माध्यमातून लागेल ती मदत करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आवर्जून सांगितले. श्री बालाजी शिक्षण संस्था व येथील सर्व शिक्षक तथा प्राध्यापक हे अत्यंत जागरूक असून ते आपल्या समाजाप्रती अत्यंत संवेदनशील देखील असून ते समाजातील दिव्यांग ,मतिमंद तसेच मूकबधिर समाजाची सेवा राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली करत असल्याचे अभिमानाने येथे संकेत मोदी यांनी उल्लेखित केले. या उल्लास मेळाव्याचा अध्यक्षीय समारोप तहसीलदार विलास तरंगे यांनी केला.

या वेळी त्यांनी ज्ञ या शब्दाने ज्ञानाची सुरुवात होते. हेच ज्ञान समाजाला पुढे घेऊन जात असल्याचे त्यांनी सांगितले आणि याच ज्ञानाने पिढ्या सुदृढ होतात. तेव्हा पिढी घडवायची असेल तर समाज साक्षर व्हायला हवा असे मत तहसीलदार विलास तरंगे यांनी या साक्षरता मेळाव्यात व्यक्त केले. ''अंधाराचे दिवस आलेत दिवा दिवा जमवायला हवा , वेळ पडलीच तर सूर्य देखील पणतीत आणून ठेवायला हवा'' या काव्य पंक्तीचा आधार घेत तहसीलदार यांनी समाजाप्रती साक्षरतेचे महत्व विशद केले. आज वेगवेगळ्या तंत्रज्ञानामुळे शिक्षण सुकर झाले असून या तंत्रज्ञानाचा वापर अत्यंत समयसूचकतेणे करून घेतला पाहिजे असे आवाहन देखील विलास तरंगे यांनी केले. आज आजी आजोबाची जागा टीव्ही ने घेतली आहे तर आई वडीलांची जागा मोबाईल ने घेतली असल्याचे सांगत तंत्रज्ञानाचा वापर योग्य रीतीने करण्याचा सल्लाही याप्रसंगी उपस्थित सर्वांना तहसीलदारांनी दिला. समाजात चांगली माणसे कशी घडतील यासाठी सुशिक्षित नागरिकांनी तसेच शालेय शिक्षकांनी प्रयत्न करावा असे मार्मिक आवाहन करत निरक्षरांना साक्षर बनवत समाजाबरोबरच देश घडवण्याची भावनिक साद तहसीलदार विलास तरंगे यांनी घातली.या मेळाव्यात समाज साक्षर करण्यासाठीव साक्षरतेचे महत्व पटवून देण्यासाठी विविध शाळातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रबंध सादर केले. ज्यामध्ये कुटुंब व रोजगार, दैनंदिन व्यवहार, विविध सण उत्सव , वेशभूषा, लोककला, खाद्यपदार्थ , विविध प्रकारचे खेळ, आपत्ती व्यवस्थापन, संवादाची माध्यमे, बँक व पोस्टाची माहिती त्याचबरोबर विविध निवडणुका व मतदान केंद्राची माहिती असे विविध प्रबंध या मेळाव्यात मांडण्यात आले होते. हा उल्लास नवभारत साक्षर मेळावा यशस्वी करण्यासाठी अंबाजोगाई तालुक्यातील अनेक जिल्हा परिषदेच्या शाळा व शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांनी आपला सहभाग नोंदवला . या मेळाव्याचे बहारदार संचलन श्रीमती मंजुषा महाजन यांनी केले तर उपस्थित सर्वांचे आभार शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी मानले.

## खडतर खेळात विनोद गर्जे यांनी मिळविला 'आयर्नमॅन-२०२४' चा बहुमान

### प्रत्येक पाटोदा वासियांना गर्व वाटावा असा बहुमान:-कर्नल कल्याण डोरले

**पाटोदा । प्रतिनिधी**

एक सैनिककच शारीरिक, मानसिक क्षमतेवर मात करून यशस्वी होऊ शकतो याची प्रचिती विनोद याने पुन्हा सिध्द केली असुन देश विदेशी खेळाडूतुन शरिराची कस ना कस लावुन विनोद आयर्नमॅन म्हणून विजेता ठरला असुन हे पाटोदा तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे.पाटोद्याचं भूमिपुत्र राहुल आवारे व इतर खेळाडूंनंतर विनोदने खडतर खेळात पुन्हा पाटोद्याचं नाव कोरलं आहे. हे प्रत्येक पाटोदा वासियांना गर्व वाटावा असाच बहुमान आहे.कर्नल कल्याण डोरले यांचे प्रतिपादन ते विनोद गर्जे यांच्या सन्मान सोहळा निमित्त बोलत होते.



शारीरिक आणि मानसिक क्षमतांची परीक्षा घेण्यासाठी प्रसिद्ध असलेली विदेशातील स्पर्धा डेक्कन स्पोर्टस क्लब पुणे यांच्या वतीने आयर्नमॅन-२०२४ ही खडतर स्पर्धा कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आली होती त्यांमध्ये पाटोदा तालुक्याचे भुमिपुत्र व इंडियन पोस्ट पाटोदा शाखेचे व्यवस्थापक श्री.विनोद पोपट गर्जे यांनी यशस्वीरित्या पूर्ण केली.जगभरातून सहाशे ते सातशे स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.विनोद गर्जे यांनी निर्धारित वेळेपेक्षा कमी कालावधीत स्पर्धा पूर्ण करून पाटोदा तालुक्याची मान उंचावली.

अतिशय खडतर व अवघड असलेली ही स्पर्धा अवघ्या ८ तासांमध्ये पूर्ण करावी लागते. यामध्ये प्रथम दोन किलोमीटर स्विमिंग,९० किलोमीटर सायकलिंग आणि २१ किलोमीटर रनिंग (धावणे) या तीन स्पर्धांचा समावेश असतो.विनोद यांनी ७ तास १२ मिनिटांत ही स्पर्धा पूर्ण केली. रविवारी (दि.८ ) पहाटे ६ वाजता ही स्पर्धा सुरू झाली, ती दुपारी २ वाजता संपली. वयाच्या ३८ व्या वर्षी विनोद यांनी निर्धारीत वेळेपेक्षा कमी वेळेत बाजी मारली. बीड जिल्ह्यासह पाटोद्यासाठी ही अभिमानास्पद बाब असून, सर्वच स्तरांतून विनोद गर्जे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.याच अनुषंगाने कर्नल कल्याण डोरले यांनी बुधवार दि.११ रोजी विनोद गर्जे यांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्रीमंत काकडे साहेब, राजाभाऊ सानप साहेब,मच्छिंद्र भालेकर, प्रसाद मोराळे व बेद्रे आण्णा. आदी नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांचे आभार व्यक्त करताना विनोद गर्जे म्हणाले की भारतीय सैन्य दलामध्ये ज्युनिअर कमांडिंग ऑफिसर म्हणून एकुण तेरा वर्षे कार्य केले असून त्यामुळे खेळाडू वृत्ती व ऐकाग्रता असल्यानेच मी स्वताला या खडतर खेळात सिध्द करू शकलो.या पुढेही विविध स्पर्धेत सहभागी होऊन तालुक्याच नाव उज्वल करण्याचा प्रयत्न करणार असल्याच मत व्यक्त केले...

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कार्यकाळ ११ महिने वाढवा यासाठी प्रशिक्षणार्थींची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

अंबड । प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेमध्ये युवा प्रशिक्षणार्थींना शासकीय कामकाज करण्याचे प्रशिक्षण मिळत आहे.त्याचप्रमाणे या काळात मानधन सुध्दा मिळत असल्याने ही शासनाची एक सर्वोत्कृष्ट संकल्पना आहे.या योजनेचा लाभ आमच्या सारख्या सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणींना बेरोजगारी हटविण्यासाठी होत असल्यामुळे या योजनेचा कार्यकाळ ११ महिने वाढवा अशी मागणी अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

तहसीलदार विजय चव्हाण यांच्या मार्फत आज (ता.१६) सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थींनी म्हटले आहे की,महाराष्ट्र शासन युवा कार्यप्रशिक्षण योजना ही राज्य



पातळीवर मोठ्या प्रमाणात सुरु आहे या योजनेचा लाभ आमच्या सारख्या सुशिक्षित बेरोजगार तरुण- तरुणींना बेरोजगारी तसेच आमच्यावर निर्भर कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटवण्यासाठी हातभार म्हणून होईल. त्यामुळे युवा कार्यप्रशिक्षण योजनेचा प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर ११ महिने कालावधी वाढवून देण्यात यावा अशी कळकळीची विनंती सर्व प्रशिक्षणार्थी यांनी निवेदनात केली असून आमच्या या निवेदनाला मानविय दृष्टीकोनातून स्विकारावे असेही म्हटले आहे.

या निवेदनावर अंबड तालुक्यातील प्रशिक्षणार्थी

पांडूरंग मुसळे,अमोल कोरडे,आकाश गाढवे, आकाश खरात, ज्योती बोंबले,अश्विनी खरात,

पुनम आष्टेकर,प्राजक्ता देशमुख,वर्षा थेटे,मनिषा तांबडे,वैष्णवी चव्हाण,शितल शिंदे,उषा कोळेकर, महेक शेख,पूजा भालके,वृषाली कनके,सोनाली राक्षे,अर्चना मुळे,सारिका मस्के,लहू शेळके,विठ्ठल डोखळे,गणेश सावंत, संकेत वाघ, मिलिंद पारदे, कैलास परमेश्वर,रविंद्र जोरले,महेश साठे,किशोर डोईफोडे,कुंडलिक आव्हाड,अनिल पारदे,सचिन कामठे,सोहेल पठाण,आबासाहेब पवार,उद्धव काळवणे,कपिल मुंजाळ, दत्ता केजभट,रामेश्वर ढापसे आदींची नावे आहेत.

## मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये विविध प्रकारच्या स्पर्धांचे पुरस्कार वितरण आणि आगामी वर्षातील संकल्पाने ११व्या अंबाजोगाई साहित्य सम्मेलनाची सांगता



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

विविध प्रकारच्या स्पर्धांचे पुरस्कार वितरण आणि संमेलन सजवणाऱ्या हातांचा सत्कार या सह आगामी वर्षातील संकल्पाने ११व्या अंबाजोगाई साहित्य सम्मेलनाची सांगता मान्यवरांच्या उपस्थिती मध्ये झाली. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ आदित्य पतकरावं, सुदर्शन रापतवार (स्वागताध्यक्ष), दगडू लोमटे (अध्यक्ष, मसाप), अमर हबीब तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सम्मेलन अध्यक्ष बालाजी सुतार हे होते.

या प्रसंगी बोलताना डॉ आदित्य पतकरावं म्हणाले की, सौभाग्य काय असतं ते मला आज या माझ्या मायभूमी मधील व्यासपीठावर कळलं. आपण मेहनत केली तर निश्चितच यश मिळते हे मी माझ्या जीवनातील संघर्षा वरून कळलं. शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीवर विद्यार्थी घडत असतो. अमर काका यांच्या संकल्प पूर्ती साठी या वेळी १० हजार रु ची मदत दिली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बालाजी सुतार म्हणाले की, आपण लोका पासून तुटतो आहोत का? हा या निमित्याने पडलेला प्रश्न असून या मध्ये सर्वाना सोबत घेऊन साहित्याची वाटचाल व्हावी. कशाचीही तमा न बाळगता काही साहित्यिकाने आपल्या भूमिका मांडल्या आहेत हा इतिहास आहे.

कविता लिहणे ही अत्यन्त गंभीर कृती असते. या प्रसंगी मार्गदर्शक अमर हबीब यांनी फेब्रुवारी मध्ये मराठी भाषा दिवसा निमित्य मुकुंदराज परिसरात कवी सम्मेलन, भावठाणा येथे अनिकेत लोहिया लोहिया स्वागताध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण कवी संमेलन, दिवंगत साहित्यिकांचा दस्तऐवजिकरण करणे यामुळे त्यांची आठवण राहील. आदी संकल्प जाहीर केले.या वेळी स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांचा मसाप अंबाजोगाईच्या वतीने सत्कार करण्यात आला. या वेळी बोलताना सुदर्शन रापतवार म्हणाले की, सम्मेलन यशस्वी करण्यासाठी म सा प च्या पदाधिकाऱ्यांनी मला सहकार्य केले. सम्मेलन यशस्वीते साठी नवीन उपक्रम राबवण्यात आले. सर्व उपक्रम व परिसवादाला चांगला प्रतिसाद मिळाला. या निमित्य समाज माध्यमावरील मुके पणा बद्दल मला चिंता वाटते आहे. एक सजग पत्रकार म्हणून मला हे अस्वस्थ करणारे आहे. या वेळी साहित्य सम्मेलना निमित्य विविध स्पर्धाचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.या प्रसंगी संमेलन सजवणाऱ्या हातांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन तिलोत्तमा पतकराव, प्रा. डॉ. सागर कुलकर्णी, आभार प्रदर्शन - गोरख शेंद्रे (सचिव) यांनी तर संयोजन अनिकेत डिघोळकर, शरद लंगे यांनी केले.



नवनिर्वाचित आमदार डॉ हिकमतदादा उढाण हे घनसावंगी विधानसभा मतदार संघातून निवडून आल्याबद्दल यांचा सत्कार करताना भाजपा जैन प्रकोष्ठ विधानसभा समन्व्यक नरेंद्र जोगड

## शेतकऱ्यांना अतिवृष्टीने बाधित खरीप पिकांच्या नुकसानसाठी ४१२ कोटीचे अनुदान

परतुर । प्रतिनिधी

वंचित, पीडित, विस्थापित, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी वर्गाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याकरिता गेल्या ४० वर्षापासून अविरत संघर्ष करणारे लोकप्रिय लोकप्रतिनिधी म्हणून राज्यभरात ओळख असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश आले आहे. जालना जिल्ह्यातील २ लाख ८२ हजार ५३८ शेतकऱ्यांचे खरीप हंगाम २०२४ मध्ये अतिवृष्टी, गारपीट वादळ वारा आणि पुरामुळे २ लाख ५५ हजार ५१९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. खरीप पिका सह फळबागांच्या नुकसानी पोटी जालना जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार लोणीकर यांच्या आग्रही मागणी नुसार जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांसाठी सुमारे ४१२ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मंजूर केले आहे. या मूळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा मिळाला आहे. ०१ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीने आलेल्या पुरामुळे, सततधार झालेल्या पावसासह वादळ वारा आणी गारपीटीने मंठा व परतूर तालुक्यातील झालेल्या नुकसानीची पाहणी भरपावसात माजी मंत्री तत्कालीन आमदार बबनराव लोणीकर यांनी पोळा सणाच्या दिवसी गावा गावात जाऊन केली होती. यावेळी अतिवृष्टीने बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले होते.



याबाबतीत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी तहसील कार्यालय मंठा व तहसील कार्यालय परतूर येथे आढावा बैठक घेऊन मंठा परतूर व जालना तालुक्यातील गावा गावातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची व पडझड झालेल्या नुकसानग्रस्त घरांची तातडीने पंचनामा करून जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानंतर तातडीने लगेचच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधित खरीप हंगामातील पिका सह फळबागाच्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात करिता तातडीने विभागीय आयुक्त यांच्याकडे अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जून ते ऑक्टोबर, २०२४ या महिन्यात ''अतिवृष्टी/पूर'' यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. या अनुषंगाने तातडीने

पोर्टलव्दारे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सदरील अनुदान निधीतून कुठल्याही प्रकारच्या कर्जाची वसुली करण्यात येऊ नये असे आदेश शासन निर्णयान्वये पारित झाले आहे. सदरील अनुदान प्रति शेतकरी तीन हेक्टर पर्यंत मर्यादित असल्याची देखील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले असल्यामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून गावागावातील शेतकरी बांधव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानत आहेत.

### जाहीर प्रगटन

**तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी अंबड जि.जालना कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक :- ०२४८३-२७५०२६

जा.क्र.२०२४/ सेतु/कावि-१६२३ Email-tahsildarambad@gmail.com दिनांक: १३/१२/२०२४

प्रविण राममाऊ घुले रा. बारसवाडा

विरुध्द

ग्रामपंचायत कार्यालय नगर परिषद बारसवाडा ता. अंबड

विषय- कलम १३(३) जन्म मृत्यू नोंदणी कायदा प्रमाणे जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मिळणेबाबत तलाठी / ग्रामसेवक मधील जाहीर प्रगटण करणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार नामे प्रविण रामभाऊ घुले रा. बारसवाडा ता.अंबड जि. जालना येथील राहिवाशी असुन अर्जदार यांनी त्यांच्या आई नामे माझे अंजना रामभाऊ घुले यांची त्यांनी मृत्यूची यांची मृत्यू दि. ०१/०१/२०१४ रोजी बारसवाडाअसल्याचे अर्जात नमूद केले असुन त्या अनुशंगाने त्यांनी मृत्यू प्रमाणपत्र आदेश मिळण्यासाठी त्यांनी या न्यायालयात/ अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी, सदर जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, जन्म/मृत्यू नोंद बाबत कोणाचाही कोणताही अक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी स्वरूपात अक्षेप सादर करावा जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप या कार्यालयास प्राप्त झाला नाही तर संबधित प्रकरणात कायदयाप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि. १३/१२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले जाते.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार अंबड**

पान ६ वरून...

### उर्मट,उध्दट शाखाधिकारी जागा

जागा मालक शेख हरूण आणि शेख युनूस यांनी अनेक वेळा जागा परत ताब्यात देण्याची मागणी केली असता शाखाधिकारी यांनी त्यांचे म्हणणे ऐकून न घेता शाखेचे सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार त्यांना उद्धट आणि उर्मट वागणूक दिली या जागा मालकांनी अनधिकृत ताबा आणि भाड्याच्या फरकाच्या रक्कमेची वेळोवेळी मागणी केली परंतु शाखाधिकार्यांनी मनमानी करून जागा मालकाच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष केले त्यामुळे जागा मालक शेख हरवून आणि शेख युनूस यांनी शाखेच्या इमारतीसमोर उपोषण आंदोलन सुरू केले या उपोषणाची दखल अधिवक्ता परिषदेचे प्रांत उपाध्यक्ष ॲड. बाबूराव अनारसे, आष्टी पंचायत समितीचे माजी सभापती रंगनाथ धोंडे, मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटचे चेअरमन नामदेव राऊत, सामाजिक कार्यकर्ते सय्यद शफी यांनी घेऊन शाखाधिकारी यांचे शी संपर्क केला त्यानंतर अखेर सायंकाळी शाखाधिकारी यांनी जागेचा ताबा देऊन फरकाची रक्कम देणे बाबत वरिष्ठांशी चर्चा करून निर्णय घेऊ असे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण कर्ते जागा मालकांनी उपोषणाची सांगता केली भारतीय स्टेट बँक शाखेच्या शाखाधिकाऱ्यांच्या उद्धट आणि मनमानी कारभाराबद्दल ग्राहकांमध्ये तीव्र नापसंती व्यक्त केली जात आहे

स्टेट बँकेच्या शाखेचे स्थलांतर होऊन दहा महिने झाले तरी आमच्या जागेचा ताबा दिला नाही याबाबत याबाबत विचारणा केली असता शाखाधिकारी यांनी अत्यंत उर्मट उत्तरे देऊन.. ''कपिल सिब्बल इनके पास गये तो भी मै ताबा नही देने वाला '' असे उद्धट उत्तर देऊन मनमानी करणाऱ्या राकेश आर.शाही या मुख्य शाखा व्यवस्थापकाची चौकशी करावी..

-- शेख युनूस शेख हरूण जागा मालक

### वाल्मिक कराड यांच्यावरील

कराड यांची सोशल मीडियावरून सुरू असलेली जाणीवपूर्वक बदनामी थांबवावी अशी प्रशासनास विनंती केली आहे. तसेच वाल्मिक अण्णा यांच्यावरचा गुन्हा लवकरात लवकर मागे घ्यावा अन्यथा राष्ट्रवादी युवक काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल याची नोंद व दखल प्रशासनाने घ्यावी असे निवेदनात नमूद केले आहे. सदरील निवेदन देताना अजितदादा पवार गट राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष उमेश पोखरकर, तिरूपती राठोड, दीपक पवार, कोंडीराम पवार, दीपक लामतुरे, बालाजी रूद्राक्ष, राया धारेकर, केशव जोगदंड, आकाश लोदगे, शशिकांत शेप, आशिष केंद्रे, अजय शेप, गौस पठाण, साखेब शेख, रिझवान पटेल, संतोष उजगरे, दिनेश देवकते, सोनू शिंदे, योगेश जिरे, कृष्णा नरसिंगे, सीताराम लांब यांच्यासह सर्व मित्र परिवार आदींसह उपस्थित होते.

cmyk

# खेड्याच्या शाश्वत विकासाशिवाय देशाचा विकास अशक्य

## माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांचे प्रतिपादन

संभाजीनगर : लोकसहभागातून खेड्याचा शाश्वत विकास झाल्याशिवाय देशाचा विकास शक्य नाही, असे प्रतिपादन माजी विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी केले.

ग्रामविकास संस्था रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त ग्रामविकास भवन, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित ग्रामविकासाची सद्यःस्थिती–आव्हाने व उपाययोजना कार्यशाळेचे उद्धाटक म्हणून बोलत होते. याप्रसंगी डॉ. सर्जेराव ठोंबरे, नरहरी शिवपुरे, डॉ. भगवानराव कापसे, कैलास तवार, अप्पासाहेब उगले, मनोहर सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.




भापकर म्हणाले, की गाव हेच मंदिर समजून सरपंचांनी गावच्या सर्वांगीण विकासाकरिता नियोजनबद्ध कालबद्ध कार्यक्रम राबवावा. डॉ. ठोंबरे म्हणाले, की कार्यशाळेला उपस्थिती सर्वजण सामाजिक बांधिलकी म्हणून प्रत्यक्ष कृती करणारे आहेत. त्यामुळे या कार्यशाळेला विशेष महत्त्व आहे. विकसित भारत समर्थ भारताकरिता ग्रामीण भागाचा विकास होणे ही काळाची गरज आहे. कार्यशाळेत अनुक्रमे ग्रामविकासाची सद्यःस्थिती आव्हाने व उपाययोजना, शेती, स्वयंरोजगार,शिक्षण या विषयावर डॉ. भगवानराव कापसे, सुनील कस्तुरे, श्रीकांत कुलकर्णी यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी अरविंद केंद्रे, प्रा. जयप्रकाश बागडे, अशोक गुरनाळे, रामचंद्र पिल्दे, दिगंबर निकाळजे, शिवाजीराव घुगे, प्रा. उषा वाटणे, बाबासाहेब गोजरे, दादासाहेब शिंदे, राम वाघ, अर्जुनराव ढगे, मीनाक्षी बिराजदार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारती खरटमल यांनी तर आभार बालाजी बिरादार यांनी मानले.

# संत्रावर्गीय पिकावरील डिंक्या रोगावर नियंत्रण आणि उपाय


अलीकडे संत्राबागांवर डिंक्या व इतर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्याने संत्रा उत्पादकांची चिंता वाढली आहे. डिंक्या हा रोग बुरशीजन्य असून, झाडाला कुठल्याही अवस्थेत होतो, परंतु नवीन लागवडीमध्ये याचा प्रादुर्भाव अधिकच हानिकारक ठरतो. शेतकऱ्यांनी या रोगाचे वेळीच योग्य व्यवस्थापन केल्यास आर्थिक नुकसान टाळता येईल. प्रतिकूल हवामानामुळे शेंडेमर, डिंक्याचा प्रादुर्भाव वाढत असल्याने संत्रा बागांना धोका निर्माण झाला आहे.

डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव व लक्षणे : दुर्लक्षित संत्र्याच्या बागांत 'फायटोप्थोरा' बुरशीमुळे हा रोग आढळून येतो. डिंक गळणाऱ्या झाडावर विपरीत परिणाम होतो. या बुरशीमुळे साल व खोडामध्ये डिंक साठतो. डिंकाच्या दाबामुळे झाडाची साल उभी फाटते व डिंक ओघळू लागतो. कधी–कधी साल गळून पडते, पाने पिवळी पडतात व फांद्या सुकतात. रोगाची लागण फळांनाही होते. फळावर तेलकट नारिंगी डाग दिसून येतात व फळे गळून पडतात. झाडाच्या कुठल्याही अवस्थेत हा रोग होतो, परंतु नवीन लागवडीमध्ये डिंक्याचा प्रादुर्भाव अधिकच हानिकारक ठरतो. या रोगाचा प्रसार उष्ण तापमानात म्हणजे २७ ते ३० डिग्री सेल्सिअस असताना बुरशी मोठ्या प्रमाणात वाढते. दुर्लक्षित संत्रा बागात बुरशीमुळे होणार्या डिंक्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यामुळे संत्रा उत्पादकांनी वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक असते.

असे करा व्यवस्थापन : रोग प्रतिकारक जातीचा जंबेरी खुंटावर जमिनीपासून १७ सेंटिमीटर अंतरावर डोळे भरावे. पाणी देताना झाडाच्या खोडाला दोन आळे पद्धतीने पाणी द्यावे, त्यामुळे पाण्याचा बुंध्याशी संपर्क येणार नाही. रोगट भागावरील साल खरवडून काढावी व त्यावर बोर्डो पेस्ट लावावी. (एक भाग मोरचूद, एक भाग चुना व आवश्यक तेवढे पाणी) यामुळे रोगकारक बुरशीचा नाश होईल.

ज्या ठिकाणाहून डिंक ओघळतो तेथील साल झाडाच्या आतील भागास इजा होणार नाही अशा प्रकारे तीक्ष्ण चाकूने खरवडून काढावी. नंतर १% पोटॅशियम परमँगनेट या द्रावणाने धुवून काढावी. नंतर जखमेवर ५० ग्रॅम मॅटको (मेटॅलॅक्सिल ८% + मँकोझेब ६४ %) किंवा फॉसीटिल एएल २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे मिसळून पेस्ट लावावी. डायबॅक हा रोग प्रामुख्याने जंबेरीवर डोळे भरल्याने दिसून येतो. याकरिता पहिली बाब म्हणजे, जंबेरीवर डोळे न भरता इतर सुयोग्य खोडावर डोळे भरून कलमे तयार करावीत. महाराष्ट्राकरिता मार्मालेड, ॲलिमो, रंगपूर संत्र्याचे खोड उपयोगात आणावे.

ट्रिस्टेझा आणि ग्रीनिंग हे रोग मावा व सायला या किडींमुळे पसरतात. या किडीच्या व्यवस्थापनासाठी नागपूरी संत्र्याला नवती आल्यानंतर नीम तेल १०० मिली प्रति १० लीटर पाणी या प्रमाणात मिसळून १५ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. नीम तेल पाण्यात मिसळत नसल्यामुळे १० ग्रॅम डिटर्जंट पावडर प्रति १०० मिली नीम तेलात मिसळावे किंवा थायोमेथोक्झाम २५ डब्ल्यूजी १ ग्रॅम प्रति १० लीटर पाणी किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही १.५ मिली प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.





# केळीवरील 'काळी बोंडी कूज' रोगाचे नियंत्रण



केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज' म्हणून सुद्धा ओळखतो हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. सिगार एंड रॉट हा केळीच्या फळांचा प्रमुख रोग आहे. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होतो आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होतो.

रोगाचा प्रसार : हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार ॲन्ड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो

रोगाची लक्षणे : हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात.

जे स्कॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.

रोगाचे जैविक नियंत्रण : या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.

रासायनिक नियंत्रण : शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते.

मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात. परंतु फवारणीच्या १० दिवसांनंतरच फळांची काढणी करावी.

# रब्बी ज्वारीमध्ये एक कोळपणी महत्त्वाची

जमिनीतील ओलावा हा पावसावर प्रमाणावर आणि जमिनीच्या खोलीवर अवलंबून असतो. पडणाऱ्या एकूण पावसापैकी १० ते २० टक्के पाणी जमिनीवरून वाहून जाते. बाकीच्या पाण्यापैकी १० टक्के पाणी निचऱ्याद्वारे, तर ६० ते ७० टक्के बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. त्यामुळे जमिनीत केवळ १० टक्के पाणी उपलब्ध राहते. त्यासाठी पावसाचे वाहून जाणारे पाणी, निचऱ्याद्वारे आणि बाष्पीभवनाद्वारे वाया जाणारे पाणी जास्तीत जास्त साठवून त्याचा पीक उत्पादनासाठी फायदा करून अत्यंत आवश्यक आहे.

कोरडवाहू शेतीच्या दृष्टीने ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. याच अनुषंगाने कोरडवाहू शेती संशोधन केंद्र, सोलापूर येथे अभ्यास करून काही महत्त्वाच्या तंत्राचा शेतीमध्ये अवलंब करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने बांधबंदिस्ती, आंतरबांध व्यवस्थापन, उतारास आडवी मशागत करणे, कोळपणी करणे, आच्छादनाचा वापर, शेततळी, जैविक बांध या सारख्या उपायांवर भर देण्यात आला. जमिनीत ओल टिकवून ठेवण्याच्या उपायाआधी जमिनीतील ओल कशी कमी होते हे पाहणे महत्त्वाचे आहे. जमिनीत साठवून राहिलेली ओल पिकांनी वापरणे, पृष्ठभागावरून बाष्पीभवनामुळे ओल उडून जाणे, भेगा पडल्यामुळे त्यातून बाष्पीभवन होणे, तणांवाटे ओल नष्ट होणे या चार मार्गांनी जमिनीतील ओल



कमी होते. त्यातील पिकाच्या प्रत्यक्ष वाढीसाठी अतिशय कमी प्रमाणात ओल लागते. बहुतांशी (सुमारे ६० टक्के) ओल ही बाष्पीभवनामुळे उडून जाते. त्यासाठी वरील उपायांचा अवलंब केल्यास कमी होणाऱ्या ओलीचा बंदोबस्त करणे शक्य होते.

एक कोळपणी आणि अर्धे पाणी : पीक वाढताना त्यासोबत शेतात तणही वाढत असते. हे तण पाणी, अन्नद्रव्ये आणि सूर्यप्रकाश यासाठी मुख्य पिकांसोबत स्पर्धा करते. पीक उगवून आल्यावर त्यात ठराविक दिवसानंतर कोळपणी केली जाते. त्याचा मुख्य उद्देश तण नष्ट करणे आणि वाया जाणारी ओल थोपवण्यासाठी होतो. तणांच्या प्रादुर्भावामुळे कमी होणारी ओल, तणांचा बंदोबस्त केल्याने टिकवून ठेवली जाते. याशिवाय कोळपणी केल्यामुळे जमिनीच्या पृष्ठभागावर एक पोकळ थर तयार होतो. त्यामुळे उडून जाणारी ओल थोपविता येते. यामुळे ओल टिकवून धरण्यामध्ये 'कोळपणी'चा फार मोठा वाटा आहे. रब्बी हंगामात कोळपणी अत्यंत महत्त्वाचा भूमिका बजावते. एकदा कोळपणी केली, तर जवळपास एक पाणी दिल्याप्रमाणे फायदा होतो. या तत्त्वाचा अवलंब करून कोरडवाहू शेती तंत्रामध्ये रब्बी ज्वारीकरिता तीन वेळेस कोळपणी करण्याची शिफारस करण्यात आली आहे. पहिली कोळपणी पीक तीन आठवड्यांचे झाल्यानंतर फटीच्या कोळप्याने करावी. त्यामुळे शेतात वाढणारे तण नष्ट होऊन पाण्याचा होणारा अपव्यय टाळता येतो. दुसरी कोळपणी पीक पाच आठवड्यांचे झाल्यानंतर, पासेच्या कोळप्याने करावी. त्या वेळेस जमिनीतील ओल कमी झाल्याने जमिनीला सूक्ष्म भेगा पडण्यास सुरुवात झालेली असते. या कोळपणीमुळे या भेगा बुजण्यास मदत होते. त्यामुळे बाष्पीभवनाची क्रिया मंदावते. तिसरी कोळपणी पीक आठ आठवड्यांचे झाल्यानंतर करावी. या कोळपणीसाठी दातेरी कोळपे वापरण्याची शिफारस आहे. या काळात जमीन टणक झाली असल्याने फासाचे कोळपे व्यवस्थित चालत नाही. तिसऱ्या कोळपणीसाठी दातेरी कोळपे वापरल्यास ते मातीत व्यवस्थित घुसून माती मोकळी होऊन भेगा बुजविल्या जातात. जमिनीत ओल फार कमी असेल, त्यावेळी आणखी एखादी कोळपणी केल्यास फायदेशीर ठरते.




## महत्वाच्या घटना

१३९८ : मंगोल साम्राज्याचा सम्राट तैमुर पहिला याने दिल्ली वर हल्ला केला होता.
१७१८ : ग्रेट ब्रिटनने स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले.
१७७७ : फ्रान्सने अमेरिका या देशाला मान्यता दिली.
१८०३ : इस्ट इंडिया कंपनी ने ओडीसा वर आपला दावा निर्माण केला.
१९०३ : राईट बंधू यांनी पहिल्यांदा ''द फ्लायर'' नावाचे विमान १२ सेकंदांसाठी उडवले होते.
१९२७ : हिन्दुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे क्रांतिकारक राजेन्द्र नाथ लाहिरी यांना ब्रिटिश सरकारने निर्धारित तारखेच्या दोन दिवस आधीच गोंडा तुरुंगात फाशी दिले.
१९२८ : भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांनी ब्रिटिश पोलिस ऑफिसर जेम्स साँडर्स याची लाहोर येथे हत्या केली.
१९४० : महात्मा गांधीयांनी वैयक्तिक सत्याग्रह चळवळीला स्थगिती दिली.
१९४१ : दुसरे महायुद्ध – जपानी फौजांचे उत्तर बोर्निओ येथे आगमन
१९७० : जयंतीलाल छोटालाल शहा यांनी भारताचे १३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९७१ : आजच्या दिवशी भारत आणि पाकिस्तान यांचे युद्ध समाप्त झाले.
२००२ : तुर्की ने भारताला काश्मीर मुद्द्यावर समर्थन केले होते.
२००८ : शीला दीक्षित यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.
२०१६ : लेफ्टनंट जनरल बिपीन रावत यांची लष्करप्रमुखपदी आणि एअर चिफ मार्शल बी. एस. धनाओ यांची वायुदलप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली.
२०१६ : विजेंदर सिंग यांनी फ्रान्सिस चेका ला हरवून डब्ल्यूबीओ आशिया पॅसिफिक सुपर मिडलवेट जेतेपद स्वतःकडेच जिकून ठेवले.
२०१६ : आयपीएस ए. के. धस्माना यांची रॉ च्या प्रमुखपदी तर राजीव जैन यांची आयबी च्या प्रमुख पदी निवड करण्यात आली.
२०१६ : शरद पवार यांनी एमसीए (मुंबई क्रिकेट असोसिएशन) च्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.

## जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५६ : सम्राट अकबरच्या दरबारातील प्रसिद्ध कवी रहीम यांचा जन्म.
१७७८ : सर हंफ्रे डेव्ही – विद्युत पृथक्करणाद्वारे सोडिअम आणि पोटॅशिअम ही मूलद्रव्ये प्रथमच वेगळी करणारे इंग्लिश भौतिक व रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ मे १८२९)
१८४९ : लालमोहन घोष – देशभक्त, काँग्रेसचे १६ वे अध्यक्ष, भारताच्या विविध राजकीय हक्कांकरिता त्यांनी इंग्लंडमधील ब्रिटिश जनतेत प्रचार केला. (मृत्यू: १८ आक्टोबर १९०९)
१९०० : मेरी कार्टराइट – इंग्लिश गणितज्ञ (मृत्यू: ३ एप्रिल १९९८)
१९०१ : यशवंत गोपाळ तथा य. गो. जोशी – मराठी लघुकथाकार व 'प्रसाद' मासिकाचे संपादक. 'वहिनीच्या बांगड्या', 'शेवग्याच्या शेंगा' या त्यांच्या कथांवर चित्रपट काढण्यात आले. 'दुधाची घागर' हे त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. (मृत्यू: ७ नोव्हेंबर १९६३)
१९०५ : मुहम्मद हिदायतुल्लाह – भारताचे सहावे उपराष्ट्रपती (२० ऑगस्ट १९७९ २० ऑगस्ट १९८४) आणि अकरावे सरन्यायाधीश (२५ फेब्रुवारी १९६८ १६ डिसेंबर १९७०) (मृत्यू: १८ सप्टेंबर १९९२)
१९११ : डी. डी. रेगे – विलक्षण बोलक्या आणि जिवंत व्यक्तिचित्रणाच्या अत्यंत दुर्मिळ हातोटीमुळे अनेक नामवंतांकडून सन्मानित झालेले चित्रकार व लेखक, लोकसभा व विधानसभेतील अनेक राष्ट्रपुरुषांची चित्रे त्यांनी काढलेली आहेत. (मृत्यू: २ सप्टेंबर १९९९)
१९२४ : गोपालन कस्तुरी – पत्रकार, 'द हिन्दू' चे संपादक (मृत्यू: २१ सप्टेंबर २०१२)
१९४७ : दीपक हळदणकर – दिग्दर्शक व चलचित्रकार
१९७२ : जॉन अब्राहम – अभिनेता व मॉडेल
१९७८ : रितेश देशमुख – अभिनेता.

## मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७४० : चिमाजी अप्पा पेशवाईतील पराक्रमी सेनापती. त्यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातून पश्चिम किनारा मुक्त केला. मोठ्या निकराची झुंज देऊन पोर्तुगीजांच्या ताब्यातील वसईचा किल्ला व साष्टी बेट जिंकून घेतले.
१९०७ : लॉर्ड केल्व्हिन – इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ व गणितज्ञ (जन्म: २६ जून १८२४)
१९२७ : राजेन्द्र नाथ लाहिरी – क्रांतिकारक (जन्म: २३ जून १९०१)
१९३३ : थुब्तेन ग्यात्सो – १३ वे दलाई लामा (जन्म: १२ फेब्रुवारी १८७६)
१९३८ : चारुचंद्र बंदोपाध्याय – बंगाली कथालेखक व कादंबरीकार. 'प्रवासी', 'मॉडर्न', 'रिव्ह्यू' इ. पत्रकांच्या संपादनात त्यांचा वाटा होता. (जन्म: ११ आक्टोबर १८७६ चांचल, माल्डा, बांगला देश)
१९४५ : हिंदी आणि मराठी चित्रपट सृष्टीचे कलाकार विजू खोटे यांचा जन्म.
१९५६ : पं. शंकरराव व्यास – गायक व संगीतशिक्षक, पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य (जन्म: २३ जानेवारी १८९८)
१९५९ : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या – स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (जन्म: २४ डिसेंबर १८८० गुंडुगोलानू, पश्चिम गोदावरी, आंध्र प्रदेश)
१९६५ : जनरल कोडेन्डेरा सुबय्या तथा के. एस. थिमय्या – भारतीय भूदलाचे ६ वे सरसेनापती, पद्मभूषण, मवावीरचक्र. १९४८ म धे काश्मीरमधील पाकिस्तानी आक्रमकांचा पराभव करणार्या भारतीय सैन्याचे ते प्रमुख होते. (जन्म: ३० मार्च १९०६)
१९८५ : मधुसूदन कालेलकर – नाटककार, कथाकार आणि पटकथाकार (जन्म: २२ मार्च १९२४).

# आंदोलनकर्ते यांना शेड,पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहांची व्यवस्था करा-डॉ.गणेश ढवळे



बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील शासकीय कार्यालये उदाहरणार्थ जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसिल कार्यालयाच्या नविन इमारतीच्या नियोजित आराखड्यात आंदोलनकर्ते यांना बसण्यासाठी जागा, निवारा शेड,पिण्याचे शुद्ध पाणी व स्वच्छतागृहाची सोय करण्यात यावी आणि बीड शहरातील बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गावरील रूंदीकरण दरम्यान नालीच्या कामासाठी शासकीय कार्यालयासमोरील संरक्षक भिंती आणि नगरपालिकेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली त्यामुळे शासकीय कार्यालयात येणा-या नागरीकांची गैरसोय होत असुन नालीचे बांधकाम पूर्ण झालेल्या ठिकाणी तातडीने संरक्षक भिंत आणि स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.अथवा लोकवर्गणीतून आंदोलनकर्त्यांना निवारा शेड बांधण्याची रितसर परवानगी देण्यात यावी अशी

मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन,शेख मुस्ताक यांनी शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे करत प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा ईशारा दिला आहे. बीड शहरातील नगररोड वरील जिल्हाधिकारी, तहसिल, पंचायत समिती, सामाजिक न्याय भवन शासकीय कार्यालये याठिकाणी आंदोलनकर्ते यांना निवारा असणारी मोठमोठाली झाडे जिल्हा प्रशासनामार्फत तोडण्यात आली असुन आंदोलनकर्ते यांचा निवारा हिरावला गेला आहे.तसेच नवनिर्माण जिल्हाधिकारी व तहसील कार्यालय आवारात आंदोलनकर्ते यांच्यासाठी नियोजित जागा, निवारा शेड, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करण्यात यावी. बीड शहरातुन जाणा-या बीड ते नगर रोड राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण दरम्यान नाली बांधकामासाठी बीड शहरातील न्यायालय, तहसिल, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम, पोलिस मुख्यालय आदि शासकीय कार्यालया समोरील नगरपरिषदेने बांधलेली स्वच्छतागृहे तोडण्यात आली असुन शासकीय कार्यालयात कामकाजासाठी येणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असुन नाली बांधकाम झालेल्या ठिकाणी तातडीने स्वच्छतागृहे बांधण्यात यावीत.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात अतिथी व्याख्यान संपन्न



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सोमवारी (दि.९) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे विद्यार्थी विकास मंडळ व महाविद्यालयाचा सांस्कृतिक विभाग व विद्यार्थी विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेअंतर्गत विशेष व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. प्रमुख वक्ते म्हणून खर्डा येथील श्री संत गजानन महाविद्यालयाचे प्रा. धनंजय जवळेकर उपस्थित होते. व्यासपीठावर उपप्राचार्य प्रो. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर संचालक प्रो. गणेश पाचकोरे उपस्थित होते.'स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्तिसंग्रामातील योगदान' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. धनंजय जवळेकर यांनी मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा पूर्व इतिहास स्पष्ट करत स्वामी रामानंद तीर्थ यांचे चळवळीतील मौलिक कार्य यावर सविस्तर विश्लेषण केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य हांगे यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जालिंदर लोणके यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दिलीप गिऱ्हे यांनी केले. आभार प्रा. अजिंक्य साखरे यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## लवाद नामतालिकेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड। प्रतिनिधी

बहूराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ चे कलम ८४ (४) अन्वये सन २०२५-२०२८ या कालावधीसाठी लवाद नामतालिका तयार करण्यासाठी खालील व्यक्तिकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व न्यायालयात निवृत न्यायाधिश व सेवानिवृत्त विधी अधिकारी प्रक्टीसिंग ॲडव्होकेटेस,चार्टड अकौन्टंट, कॉस्ट अकौन्टंट, राष्ट्रीय बॅका, ग्रामीण बॅंका, भूविकास बॅंका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका, व्यापारी बॅंका, नागरी सहकारी बॅंका, राज्य सहकारी बॅंका यांच्या सेवेतील व्यवस्थापक दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेले सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) सहकार विभागातील उपनिबंधक दर्जापेक्षा वरच्या दर्जाचे सेवानिवृत्त अधिकारी (ज्यांना सेवानिवृत्त होऊन दोन वर्षापेक्षा कमी कालावधी झालेला आहे) अशा व्यक्तींची नियुक्ती करताना अधिनियमामध्ये नमूद नसले तरीही खालील प्रमाणे अहर्ता पात्रता असाव्यात.

त्यांच्यावर कोणत्याही स्वरुपाचे गुन्हे दाखल नासावेत, शासकीस बॅक सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी यांची कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू नसावी व सेवेत कोणताही ठपका ठेवलेला नसावा. अशी व्यक्ती कोणत्याही काळया यादीत मध्ये समाविष्ठ नसावी. सदर व्यक्ती संबधीत विभागाच्या विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाच्या अधिपत्याखाली येणा-या जिल्हयातील रहिवासी असावा (लातूर, उस्मानाबाद, बीड, नांदेड जिल्हयातील) व्यक्ती एकावेळी एकाच विभागातून अर्ज दाखल करू शकतो. अर्जाचे विहित नमूने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांच्या कार्यालयात दि. १७ डिसेंबर २०२४ ते १६ जोनवारी २०३५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील, अर्ज सादर कण्याची अंतीम मुदत दि. १६ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी पूर्ण करुन दि. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रारुप लवाद नामतालिका प्रसिध्द होईल.ही प्रारुप नामतालिका यादी संबधित विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. प्रारुप नामीकेवर हरकती असल्यास ८. या ईमेल आयडीवर पुराव्यासह हरकती दि. २१ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर कराव्यात. हरकती निर्णय दि. ११ मार्च २०२५ रोजी करुन दि. १८ मार्च २०२५ रोजी अंतीम लवाद नामतालिका प्रसिध्द करण्यात येईल.याबाबतची जाहिर सूचना संबधित कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याचे लातूर सहकारी संस्थेचे, विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरपूरकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

## देशमुख कुटुंबियांना न्याय मिळेपर्यंत रिपाइं त्यांच्या पाठीशी-पप्पू कागदे

### पोलीस प्रशासन हे दबावाखाली काम करीत असल्याचा पप्पू कागदे यांचा आरोप

केज/प्रतिनिधी

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपी हे जो पर्यंत अटक होत नाहीत आणि त्यांना कठोर शासन होत नाही. तो पर्यंत रिपाइं देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. तसेच या हत्याकांडा तपास करणारी यंत्रणा ही कुणाच्यातरी दबावाखाली काम करीत असल्याचा आरोप रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केला. या प्रकरणाचा तपास एसआयटी मार्फत करण्यात यावा. यासाठी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून मागणी केली असल्याचे सांगितले.



या बाबतची माहिती अशी की, दिनांक १६ डिसेंबर रोजी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे हे केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबांची भेट घेवून त्यांचे सांत्वन करण्यासाठी आले होते. यावेळी त्यांच्या सोबत रिपाइंचे जिल्हा सचिव राजू जोगदंड, तालुका अध्यक्ष दिपक कांबळे, माजलगावचे तालुकाध्यक्ष अविनाश जावळे, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, जिल्हा सल्लागार उत्तम मस्के, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सरवदे, युवा रिपाइंचे निलेश ढोबळे, ईश्वर सोनवणे, राजेश सोनवणे, नाना गायकवाड, रंजित कांबळे, राहुल वाघमारे, सन्नी प्रधान यांच्यासह रिपाइंचे नेते उपस्थित होते. यावेळी पप्पू कागदे म्हणाले की, संतोष देशमुख यांचे हत्याकांड हे मानवतेला काळीमा फासणारे अत्यंत अमानवीय आणि निर्दयीपणाची परिसीमा ओलांडणारी निंदनीय घटना आहे.

त्यामुळे आम्ही रिपाइंचे कार्यकर्ते ना. रामदासजी आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. जो पर्यंत या हल्लेखोरांना अटक होत नाही आणि देशमुख कुटुंबियांना न्याय मिळत नाही; तो पर्यंत आम्ही पाठपुरावा करणार आहोत. तसेच येथील तपास यंत्रणा ही कोणाच्यातरी दबावाखाली काम करीत असल्याने अद्यापही फरार आरोपींना अटक करण्यात ते अपयशी ठरले असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. या हत्याकांडाचा तपास हा एखाद्या कर्तव्य कठोर आयपीएस अधिकाऱ्यांच्या एसआयटी मार्फत करण्यात यावा. या मागणी करीता दोन दिवसा पूर्वीच त्यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर निवस्थानी भेटून निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

## बाजार समितीकडून सुविधा नसल्याने विघ्नेश कापूस खरेदी केंद्र बंद

अंबड । प्रतिनिधी

अंबड कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत नियमाप्रमाणे कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आले विघ्नेश फार्मर्स प्रोडयुसर कंपनी लिमिटेड जिनिंग व प्रेसिंग या कंपनी कापूस खरेदी केंद्र सुरू केले आहे सदरील खरेदी केंद्र गट क्रमांक २६६ मध्ये सुरू करण्यात आले होते या केंद्रांतर्गत दहा हजार क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली आहे अशी माहिती मॅनेजर यांनी दिली आहे परंतु या खरेदी केंद्रावर शेतकरी व व्यापारी यांच्याकडून जिनिंग मालकास शिवीगाळ करण्यात आली यामुळे सदरील कापूस खरेदी केंद्र शुक्रवारपासून बंद आहे तसेच ते म्हणाले की आम्ही बाजार समिती ने सुविधा उपलब्ध करून दिल्यास कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात येईल असे मॅनेजर यांच्याकडून सांगण्यात आले



तसेच ते म्हणाले की कापसाच्या वाहनाची पार्किंग साठी जागा उपलब्ध करून देण्याचे जबाबदारी बाजार समिती यांची असती असेही सांगण्यात आले परंतु याबाबत अद्याप पर्यंत बाजार समितीच्या वतीने वाहनाच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही असे सांगण्यात आले. परंतु याबाबत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव श्री चोंथे यांना विचारले असता ते म्हणाले की कापूस खरेदी करण्यासाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे खरेदी केंद्र बंद आहे तसेच ते म्हणाले की नोंद केलेले कापसाने भरलेले वाहन७० ते ८० शेतकऱ्यांनी वाहन परत नेली तसेच ते म्हणाले की दोन एकर शेती वाहन पार्किंग साठी जागा घेण्यात आली आहे ती लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल तसेच परंतु जे शेतकरी कापसाने भरलेले वाहन परत घेऊन गेले त्या शेतकऱ्याची नुकसान भरपाई कोण करून देणार असे बोलल्या जात आहे. दुसरा पंचनामाचा भाग पुढील अंकात प्रसिद्ध करण्यात येईल

## बीडमध्ये रिपाइंकडून तीव्र निदर्शने; उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

परभणी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात असलेल्या संविधानाच्या प्रतिकृतीची (ता.१०) विटंबना झाली. त्यानंतर ११ डिसेंबर रोजी परभणी बंद दरम्यान शहरात दगडफेक जाळपोळच्या घटना घडल्या. या पार्श्वभूमीवर परभणी पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि दगडफेक करणाऱ्यांना गुन्हे दाखल करून ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्यांपैकी सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा छातीत कळ येत असल्याने रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत्यू झाल्याची घटना परभणीत घडली आहे. त्या घटनेच्या निषेधार्थ बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रिपाइंकडून मंगळवार (ता.१७) रोजी सकाळी ११ वाजता निदर्शने करण्यात येणार आहेत. सदरील निदर्शने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही निदर्शने केली जाणार आहेत.

परभणी जिल्ह्यात घडलेली संविधान अवमान घटना, देशद्रोही स्वरुपाची आहे. कारण भारतीय संविधान देशाच्या सर्वोच्च स्थानी आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीने त्याचा अवमान केला तर त्याच्यावर कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. त्यामुळे परभणी घटनेतील माथेफीरु आरोपीला कडक शासन व्हावे यासाठी रिपाइंकडून तीव्र निदर्शने केली जाणार आहेत. युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर होणाऱ्या निदर्शनास रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रिपाइं सरचिटणीस राजू जोगदंड, बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे यांनी केले आहे.


जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८२९
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०९/१२/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : गौसिया शेख इमरान सर्व्हे नं. ८४ प्लॉट नंबर १ नं.प.मि.नं.१८-५८-१/५ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-सरकारी रस्ता
पश्चिम : हरीचंद्र राऊत यांचा प्लॉट
दक्षिण-ॲड. वाघ यांचे घर
उत्तरः शेख रहिम यांचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



**जाहिर प्रगटन**

**मा. श्री.व्ही.सी. जोशी सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता.जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १७७४/२०२४**

**ॲड. फाटक व्ही. एस यांच्या मार्फत सारिका कानिफनाथ मोरे वि. निरंक**

ज्यापेक्षा **कानिफनाथ पि. दिलीप मोरे,** रा. रौळसगांव ता. जि. बीड हे दिनांक २१.०८.२०१२ रोजी भोरवाडी येथील पुलावर पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार १ सारिका भ्र.कानिफनाथ मोरे, वय ३३ वर्षे, धंदा घरकाम, रा. रौळसगांव ता.जि. बीड., २ करण पि. कानिफनाथ मोरे, वय १२ वर्षे, धंदा शिक्षण रा. वरील प्रमाणे अज्ञान, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, ३ राधाबाई दिलीप मोरे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे.

अर्जदार क्र १ ही मयत नामे कानिफनाथ पि. दिलीप मोरे यांची पत्नी असुन अर्जदार क्र २ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क्र. ३ ही मयताची आई आहे. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना/अर्जदारांना सदरहू मयत कानिफनाथ पि. दिलीप मोरे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

प्रकरणाची पुढील तारीख २४/०१/२०२५ आहे.

आज दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.

आदेशावरून
स्वाक्षरित (शिक्का) स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपीक** **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय क. स्तर, बीड अधिक्षक दिवाणी न्यायालय व स्तर, बीड



जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८२८
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०९/१२/२०२४

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : गौसिया शेख इमरानसि.स.नं. १३-७८ रा. अंबड नं.प.मि.नं.९-९७/२ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व-शेख नासेर शेख शब्बीर याची जागा
पश्चिम : शेख गालेब शेख चाँद याची जागा
दक्षिण-कैसर बागवान याचे रहाते घर
उत्तरः सरकारी रस्ता

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड



**नगरपंचायत घनसावंगी जि जालना प्रशासकीय इमारत, घनसावंगी**

**जा.क्र.२०२४/ नपघ/जा.प्र./कावी- २६९७**

**दिनांक:- १२/१२/२०२४**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार तारामती साहेबराव दशरथ रा.ता घनसावंगी जि. जालना यांनी नामे साहेबराव बालाभाऊ दशरथ रा.ता.घनसावंगी जि. जालना मिळकत क्रं. ६४४ च्या नावे नोंद असून वारसाआधारे नामांतर करणे बाबत आवक क्र. ४०७१ दि.११/१२/२०२४ अर्ज सादर केला आहे.अर्जासोबत ०१. साहेबराव बालाभाऊ दशरथ रा.ता. घनसावंगी जि. जालना यांचे मृत्युप्रमाणपत्र दि. २७/०४/२०२३ मा. विद्यामान दिवाणी न्यायधीश (क. स्तर) जालना यांचे वारस प्रमाणपत्र क्रं.११३/ २०२३ दि. १७/०२/२०२४ इतर वारस यांचे समंतीपत्र/शपथपत्र क्रं ११९५८ दि. २०२४ इत्यादी कागदपत्रे जोडली आहे. ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे.

चतुः सिमा : पुर्व : बोळ रस्ता, पश्चिम :- सरकारी रस्ता,दक्षिण :- भारत थोरात यांचे घर, उत्तर :- मंडाबाई दशरथ यांचे घर वरील चतुःसिमा मधील जागा वारसाआधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व शिक्याने दिले आहे.

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगरपंचायत घनसांवगी


## मराठवाडा शिक्षक संघाचे शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

### धरणे आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी व्हा -धपाटे,आजबे

बीड। प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या राज्य शासनाकडे गेल्या अनेक वर्षा पासून प्रलंबित आसलेल्या विविध मागण्याकडे लक्ष वेधण्यासाठी व त्यामार्गी लावण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने संघटनेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे, व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार दि.१९ डिसेंबर रोजी मराठवाडा विभागातील सर्व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर दुपारी ४ ते सांय.६ यावेळेत लक्षवेधी धरणे आंदोलन आयोजित केले आहे. धरणे आंदोलनात प्रचंड संख्येने सहभागी होऊन आपला असंतोष व्यक्त करावा असे आवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे आणि जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी केले आहे.

मराठवाडा शिक्षक संघाचे जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की,राज्यातील कर्मचाऱ्यांची अंशदायी पेंन्शन योजना रद्द करून सर्वांनाच जुनी पेंन्शन योजना लागू करावी, शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या २३ ऑगस्ट २०२४ च्या शासनादेशा नुसार शिक्षकांची बीएलओ तथा पर्यवेक्षक कामासह सर्व अशैक्षणिक कामातून मुक्तता करण्यात यावी.





राज्यातील निकषपात्र विनाअनुदान शाळा, वर्ग आणि तुकड्यांना प्रचलित अनुदान सुत्रा नुसार १००% अनुदान देवून शिक्षकांची वेठबिगारी थांबवावी, सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीचा तिसरा व चौथा हप्ता अदा करावा, शिक्षकांना १०,२०,३० ही तीन लाभांची आश्वासीत प्रगती योजना लागू करावी,इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शिक्षण विभागाकडून कायम स्वरुपाच्या वैयक्तिक मान्यता देण्यात याव्यात यासह इतर अनेक मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघ १९ डिसेंबर रोजी संघटनेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे, व्ही.जी.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातील सर्व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी कार्यालया समोर लक्षवेधी धरणे आंदोलन होत आहे. बीड येथील माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन होणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलन यशस्वी करावे असे अवाहन मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, केंद्रीय उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, माजी जिल्हाध्यक्ष डी.जी.तांदळे, जिल्हा मार्गदर्शक चंद्रशेखर साखरे, टी.आर. इजारे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे , केंद्र कार्यकारिणी सदस्य बंडू आघाव, अशोक मस्कले, नामदेव काळे, सुभाष शेवाळे, विजय गणगे, परवेज देशमुख, व्यंकटराव धायगुडे, हनुमंत घाडगे, गोवर्धन सानप, मनोज सातपुते, तावरे डी. एम, दत्तात्रय चव्हाण, अविनाश काजळे, युवराज मुरूमकर, विनोद सवासे, अनुप कुसुमकर, श्रीधर गुट्टे, सुमंत गायकवाड, विष्णू वळेकर, प्रदीप चव्हाण, हेमंत धानोरकर, शेख आय. जे, एम.डी. डोळे, अशोक गाडेकर, शिवाजी ढोबळे, जीवनराव थोरात, बाळासाहेब टिंगरे, दादासाहेब घुमरे, बाळासाहेब काळुशे, शामसुंदर साळुंके, सुनिल जाधव, श्रीनिवास काकडे, हनुमंत गवारे, तुळशीदास सोळंके, जगदिश्चंद्र प्रेमचंद तोष्णीवाल, नदीम युसूफ, पुरुषोत्तम येडे पाटील, संजय गोरे, अलिशान काझी, सुनिल नागरगोजे, बी.टी. खाडे सर्व तालुकाध्यक्ष, तालुका सचिव आणि जिल्हा, तालुका, शहर पदाधिकारी यांनी केले आहे.

राज्य लोकतंत्र

मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४ | ६

## ग्रेट भेट...



धनंजय मुंडे यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल संत मीराबाई संस्थानच्या मठाधिपती आईसाहेब राधाताई सानप यांनी सत्कार केला.



कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल पंकजाताई मुंडे यांचा माजलगाव मतदार संघाचे ओबीसी नेते बाबरी मुंडे यांनी सत्कार केला.



पंकजाताई मुंडे यांचा कॅबिनेट मंत्रीपदी समावेश झाल्याबद्दल माजलगाव भाजपचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत, माजी नगराध्यक्ष डॉ. अशोक तिडके, सूर्यकांत दराडे यांनी सत्कार



कॅबिनेट मंत्री म्हणून दत्ता मामा भरणे यांची निवड झाल्याबद्दल माजलगाव मतदारसंघाचे नेते माधव निर्मळ यांनी सत्कार केला. यावेळी रंजीत रुपनरसह कार्यकर्ते उपस्थित होते.



पंकजाताई मुंडे यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल दीपक मुंडे आणि संजय आंधळे यांनी सत्कार केला.



कॅबिनेट मंत्री म्हणून धनंजय मुंडे यांची निवड झाल्याबद्दल सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे आणि संतोष कंठाळे यांनी सत्कार केला.



पंकजाताई मुंडे आणि धनंजय मुंडे यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल सर्जेराव तांदळे यांनी पेढा भरवून शुभेच्छा दिल्या.



कॅबिनेट मंत्री म्हणून नितेश राणे यांची निवड झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते सचिन उबाळे व त्यांच्या मित्र परिवाराने सत्कार केला.

# बीड जिल्हा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्यूप्रकरणी सखोल चौकशीची मागणी

बीड । प्रतिनिधी

परभणी येथील सोमेश्वर सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला. याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी या मागणीसाठी विविध संघटनांच्या वतीने मंगळवारी बंदचे आवाहन करण्यात आले होते. या मागणीला प्रतिसाद देत जिल्ह्यातील बीड शहरासह केज, अंबाजोगाई, परळी, माजलगाव, गेवराई, आष्टी, शिरूर, पाटोदा आदी शहरातही बंद पाळण्यात आला. यावेळी विविध संघटनेच्या वतीने निवेदन देवून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.



## परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ माजलगाव कडकडीत बंद

माजलगाव । प्रतिनिधी

परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी या लॉचा विद्यार्थी असणाऱ्या युवकाची कारागृहात मृत्यु झाल्याची घटना घडली.या घटनेचा निषेध व्यक्त करत दि.१६ डिसेंबर सोमवार रोजी महाराष्ट्र बंदची हाक शिव फुले शाहू आंबेडकर अनुयायांच्या वतीने देण्यात आली होती.या हाकेला माजलगावात व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपले व्यवहार कडकडीत बंद ठेवले.

परभणी शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोरील संविधान शिल्पाची तोडफोड करण्यात आली होती.त्याचा परिनाम संविधान प्रेमी यूवक आक्रमक झाले. यावेळी पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करून कांही युवकांना मारहाण केली.यादरम्यान न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आलेल्या सोमनाथ सुर्यवंशी या युवकाचा कारागृहात मृत्यु झाल्याची घटना घडली.या घटनेचा निषेध व्यक्त करत दिनांक १६ डिसेंबर सोमवार रोजी महाराष्ट्र बंद ची हाक शिव फुले आंबेडकर अनुयायांनी दिली आहे.या बंदला माजलगाव शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.आपले



व्यवहार कडकडीत बंद ठेवले.दरम्यान डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे

सर्व अनुयायांनी एकत्रित होत सदरील मृत्यूस जबाबदार असणाऱ्या पोलीस प्रशासनाचा निषेध व्यक्त केला.यातील आरोपींवर ३०२ चा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी एकत्रित केली. शासनाच्या विरोधात यावेळी घोषणा देण्यात

आल्या.यावेळी बाबुराव पोटभरे, मोहन जगताप,कुरु खळगे,विजय साळवे,अंकुश जाधव,धम्मानंद साळवे,श्रीहारी मोरे, अविनाश जावळे, नवनाथ धायजे,ऍड. बी.आर.डक,ऑड अमोल डोंगरे,सय्यद

सलीमबापू,किशोर जावळे,मनोज जगताप,रामराजे रांजवण,मोहन जाधव,शे.फेरोज, शे.आसेफ, राकेश साळवे,सचिन उजगरे,भारत तांगडे,अमोल उजगरे,सदानंद प्रधान,राहुल मस्के, राज खळगे,गोविंदा टाकणखार,सय्यद फारूक,राजेश घोडे,प्रा.धम्मानंद बोराडे,अमोल शेरकर,प्रदीप पटेकर सत्यभामा सौदरमल,विजय पोळ,रूपचंद कांबळे,राजेंद्र टाकणकार,निलेश कांबळे,निलेश कांबळे,इत्यादी नेते कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान पोलीस निरीक्षक राहून सूर्यतळ यांनी चोक पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## घाटनांदुर येथे कडकडीत बंद

घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदुर येथे परभणी येथे काही दिवसापूर्वी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्या कारणाने या आंदोलनात जाळपोळ दगडफेक व वाहनांची तोडफोड करण्यात आली होती याप्रकरणी काही जणांना पोलीस कोठडी आली होती यामध्ये सोमनाथ सूर्यवंशी समावेश होत असल्यामुळे यांना न्यायालय कोठडी करण्यात आली होती त्यातच सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यामुळे घाटनांदुर येथील भीमसैनिकाकडून १६ डिसेंबर रोजी घाटनांदुर कडकडीत बंद ठेवण्यात आले होते त्याचबरोबर व्यापाऱ्यांनीही प्रतिसाद देत बंद पाळण्यात आला या सर्व भीमसैनिकांकडून परभणी येथील सर्व भीम सैनिका वरील गुन्हे मागे घेऊन सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबातील व्यक्तींना शासकीय सेवेमध्ये रुजू करून त्यांच्या कुटुंबांना ५० लाख रुपये मदत म्हणून देण्यात यावी असे निवेदन छत्रपती शिवाजी महाराज चौक घाटनांदुर येथे भीमसैनिकाकडून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक पडवळ ,उपनिरीक्षक गीते, नागरगोजे, खंदारे मुंडे ,धुमाळ व त्यांचे सहकारी यांच्याकडे निवेदन देण्यात आले घाटनांदुर बंदला पोलीस चौख बंदोबस्त करण्यात आला होता.



कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल पंकजाताई मुंडे यांचा सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे आणि युवा नेते संतोष कंठाळे यांनी सत्कार केला.



राज्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल मेघना बोर्डीकर यांचा माजलगाव मतदार संघाचे नेते माधव निर्मळ यांनी सत्कार केला.



कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल अतुल सावे यांचा युवा नेते संतोष कंठाळे यांनी सत्कार केला.

## उर्मट,उध्दट शाखाधिकारी जागा मालकाच्या उपोषण आंदोलनामुळे नरमले

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील भारतीय स्टेट बँक शाखेचे स्थलांतर होऊनही जागेचा ताबा आणि भाड्याच्या फरकाची रक्कम न देता जागा मालकांना उर्मट आणि उद्धट भाषा वापरणाऱ्या शाखाधिकार्या विरुद्ध जागा मालक बंधूंनी उपोषण आंदोलन केल्यामुळे जागेचा ताबा देऊन शाखाधिकाऱ्याला सपशेल नरमाईची भूमिका घ्यावी लागली.

आष्टी येथील नगरपंचायत हद्दीतील इमारत भारतीय स्टेट बँकेला शेख हरूण शेख जाफर



आणि शेख युनूस शेख जाफर या बंधूंनी आपल्या संयुक्त मालकीची जागा १ एप्रिल २०१६ ते १ एप्रिल २०२१ या कालावधीमध्ये भाड्याने घेतलेली होती त्यानंतर फेब्रुवारी २०२४ मध्ये भारतीय स्टेट बँकेने या शाखेचे स्थलांतर करून दुसऱ्या ठिकाणी शाखा सुरू केली

मात्र हे स्थलांतरण करत असताना पहिल्या जागेचा रितसर ताबा जागा मालकाकडे न देता कुलूप लावून त्यावर बँकेचा ताबा ठेवला ◀◀ पान ३ वर

## वाल्मिक कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या

### उपजिल्हाधिकारी यांना दिले निवेदन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

वाल्मिक अण्णा कराड यांच्यावरील खोटे गुन्हे मागे घ्या अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस (अजित पवार गट) चे जिल्हा उपाध्यक्ष उमेश पोखरकर यांनी केले आहे. याबाबत त्यांनी उपजिल्हाधिकारी यांना सोमवारी निवेदन दिले.

राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) बीड जिल्हा उपाध्यक्ष उमेश दत्तात्रय पोखरकर यांनी सोमवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, केज तालुक्यातील मस्साजोग या गांवचे सरपंच संतोष देशमुख यांची मंगळवार, दिनांक १० डिसेंबर रोजी क्रूर हत्या करण्यात आली. त्या हत्या प्रकरणामध्ये जे आरोपी आहेत. त्यांना तात्काळ अटक करून या हत्या प्रकरणाचा जलद गती न्यायालयात खटला सुरू करून जे दोषी आहेत त्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते व परळीचे माजी नगराध्यक्ष वाल्मिक आण्णा कराड यांच्यावर केज पोलिस स्टेशन येथे नोंदविण्यात आलेला खंडणीचा चुकीचा व खोटा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तो गुन्हा चुकीचा असल्यामुळे तो तात्काळ मागे घेण्यात यावा व वाल्मिक आण्णा ◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४ । पान ७

# बारामतीत चाणक्य लिहिलेला देवेंद्र फडणवीसांचा बॅनर पेटवला, पोलीस धावले, घटनास्थळी तणाव

बारामती :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बारामतीत लावण्यात आलेला बॅनर अज्ञाताने पेटवला आहे. बारामती नगर परिषदेसमोर लावलेला देवेंद्र फडणवीस यांच्या बॅनरला जाळून टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र पेटवल्यानंतर तो अर्धा जळाला असून अर्धाच शिल्लक राहिल्याचं दिसून आले. बारामतीत देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर भाजपच्या वतीने हा बॅनर लावण्यात आला होता. त्यावर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा चाणक्य असा उल्लेख देखील केला होता. त्यामुळे, बारामतीमधील काही अज्ञातांनी हा बॅनर पेटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर, भाजप कार्यकर्त्यांनी लगेच घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. तर, पोलीस देखील घटनास्थळी पोहोचले होते. दरम्यान, राज्यातील विधानसभा निवडणूक ही दोन व्यक्तींची लढाई म्हटल्यास शरद पवार विरुद्ध देवेंद्र फडणवीस यांच्यातच होती, असा राजकीय कयास लावला जातो. त्यामुळे, महायुतीच्या विजयानंतर देवेंद्र फडणवीस यांचा गौरव करताना शरद पवारांवरही




अनेकांनी टीका केली. राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्षाला घवघवीत यश मिळालं असून १३२ जागांसह भाजप महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर, महायुतीनेही २३७ जागांवर विजय मिळवत मोठं बहुमत मिळवल्याने राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं असून मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋरवपरींळी) यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यातील लढाईत महाविकास आघाडीचं पानीपत झाल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे शरद पवारांच्या नेतृत्वात महाविकास आघाडी निवडणूक लढवती. मात्र, मविआचा मोठा पराभव झाला असून शरद पवारांच्या (डहरीरव रिुरी) राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ १० जागांवर यश मिळालं आहे. त्यामुळे, देवाभाऊंनी दाखवून दिलं, देवाभाऊच महाराष्ट्राचे खरे चाणक्य अशी बॅनरबाजी देखील सोशल मीडियात पाहायला मिळाली. मात्र, बारामतीमधील असाच एक बॅनर वादग्रस्त ठरला असून बारामतीत झळकावलेला हा बॅनर एका अज्ञाताने पेटवल्याची घटना घडली आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर शरद पवार हेच राजकीय चाणक्य असल्याचं महाविकास आघाडी व राष्ट्रवादीच्या समर्थकांकडून म्हटलं जात होतं. कारण, लोकसभा निवडणुकी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा स्ट्राईक रेट सर्वाधिक होता. तसेच, त्यांचे ९ खासदार निवडून आले होते. तर, राज्यात महाविकास आघाडीला ३० जागांवर यश मिळालं होतं. त्यामुळे, विधानसभा निवडणुकीतही मविआला मोठ्या विजयाची अपेक्षा होती. मात्र, मविआचा दारुण पराभव झाला. त्यामुळे, महायुतीच्या विजयाचं श्रेय भाजप नेत्यांकडून देवेंद्र फडणवीस यांनाच दिले जात आहे. त्यातूनच देवाभाऊ, चाणक्य असा उल्लेख केला जात आहे. मात्र, बारामतीमधील चाणक्य नावाने त्यांचा झळकलेला बॅनर अज्ञातांकडून पेटवण्यात आला आहे. याबाबत माहिती मिळताच बारामती पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तो उर्वरीत बॅनर खाली उतरवला.

# देहूरोडपर्यंत मेट्रो रेल्वेचा विस्तार करण्याची मागणी

पिंपरी । प्रतिनिधी

देहूरोड ते निगडी मेट्रो रेल्वे प्रकल्प सुरू करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार) देहूरोड शहर युवकाध्यक्ष आशिष बन्सल यांनी मावळ विधानसभेचे आमदार सुनील शेळके यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

तीर्थक्षेत्र देहूगाव येथे वर्षातून तीनदा यात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक येत असतात. तर प्रतिदिनी हजारो भाविक व पर्यटक देहूत येत असतात. यासह धम्मभूमी, दीक्षाभूमी, चैत्यभूमी असा त्रिवेणी संगम असणाऱ्या देहूरोड शहरातील वर्षभर बौद्ध बांधव व पर्यटक येथे येतात. देहूरोड व निगडी या दोन्ही भागांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. मेट्रो रेल्वेमुळे या दोन्ही भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या वेळेची, पैशाची बचत होईल. मेट्रो रेल्वेमुळे



खासगी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होईल. मेट्रो रेल्वे ही पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्था असल्यामुळे प्रदूषण कमी होईल. मेट्रोमुळे शहराचा सर्वसमावेशक विकास होईल. त्यामुळे देहूरोडपर्यंत मेट्रो सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निगडी येथील भक्ती-शक्ती चौकापर्यंत मेट्रो सुविधा उपलब्ध करण्यात येत आहे. अशावेळी जवळच अडीच किमी अंतरावर असणाऱ्या देहूरोडपर्यंत मेट्रो प्रकल्पाचा विस्तार करण्यात यावा. याचा सर्व प्रवाशांना आणि परिसराला मोठ्या प्रमाणात लाभ होईल. त्यामुळे देहूरोड पर्यंत मेट्रो करावी, अशी मागणी आमदार शेळके यांच्याकडे आशिष बन्सल यांनी केली आहे. यावेळी शहराध्यक्ष प्रविण झेंडे, अतुल मराठे, जालिंदर राऊत उपस्थित होते.

# महिला पोलिस अंमलदाराला मारहाण

चिंचवड

चिंचवड-लिंक रोडवरील एल्प्रो मॉलजवळ, कर्तव्यावर असलेल्या वाहतूक शाखेतील महिला पोलिस कर्मचारी सुप्रिया बोर्हाडे यांना एक दुचाकीचालक तरुण आणि दुसर्या तरुणीने अरेरावी करत मारहाण केली. नो-पार्किंग मध्ये उभ्या केलेल्या दुचाकींना वाहतूक पोलिस टो करताना हा प्रकार घडला. या दोन्ही आरोपिंनी टोईंग व्हॅन अडवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. ही घटना शनिवारी (दि. १४) दुपारी सव्वा बारा वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिस अंमलदार सुप्रिया बोर्हाडे यांनी चिंचवड पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, मिलिंद राजेंद्र पवार (३३, रा. खडकी) आणि चिंचवड येथे राहणारी एक महिला(वय २८) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

याबाबत, पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुप्रिया बोर्हाडे या चिंचवड वाहतूक विभागात नेमणुकीस आहेत. त्या शनिवारी टोईंग व्हॅनवर कर्तव्यावर होत्या. लिंक रोडवरील एल्प्रो मॉलजवळ नो-पार्किंगमध्ये लावलेल्या दुचाकी पोलिसांच्या टोईंग व्हॅन मध्ये भरण्याचे काम सुरु असताना आरोपी तिथे आले. पोलिसांनी आरोपींची दुचाकी देखील नो-पार्किंगमध्ये पार्क केल्याने टो केली होती. त्या कारणावरून आरोपींनी पोलिस अंमलदार सुप्रिया यांना त्यांची गाडी सोडण्यास सांगितले. त्यावर, मनियमानुसार दंड भरून वाहतूक विभागाच्या कार्यालयातून गाडी घेऊन जाफ असे उत्तर त्यांनी दिले. त्या कारणावरून आरोपींनी या महिला पोलिस कर्मचारी यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. या भांडणात पोलिस अंमलदार सुप्रिया यांचा मोबाईल रस्त्यावर पडल्याने फुटला. तसेच आरोपींनी टोईंग व्हॅन अडवून गाडी सोडण्यासाठी दमदाटी केली.

## दुचाकीत सीएनजी भरताना नोझल उडाले

पुणे । प्रतिनिधी

दुचाकीमध्ये सीएनजी भरत असताना गॅसचे नोझल उडून एका कर्मचाऱ्याला त्याचा डोळा कायमचा गमावावा लागला. ही घटना तीन हत्ती चौकातील एस स्वेअर सीएनजी पंपावर घडली.

याप्रकरणी पंप मालक धार्यशील पानसरे व राहीत हरकुर्ली यांच्या विरुध्द सहकार नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत हर्षद गणेश गेहलोत (रा.शंकर महाराज वसाहत, धनकवडी ) या कर्मचाऱ्याला डोळा गमवावा लागला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हर्षद हे पंपावर सीएनजी भरण्याचे काम करतात. रविवारी सायंकाळी ते एका दुचाकीमध्ये गॅस भरत होते. यावेळी अचानक गॅसचे नोझल त्यांच्या तोंडावर उडाले. यामध्ये त्यांच्या डाव्या डोळ्याला गंभीर दुखापत होऊन त्यांना डोळा गमवावा लागला. याप्रकरणी पोलीस हवालदार संदीप चव्हाण तपास करत आहेत.

# विकासक्षम नागरिकांमुळे राष्ट्राची प्रगती - सरसंघचालक डॉ. भागवत

खराडी - भारताच्या विकासासाठी समाजातील सर्व घटकांना सक्षम करणे आवश्यक आहे. देशाचा विकास हा फक्त सेवेपुरता मर्यादित नाही. तर सेवेतून नागरिकांना विकास सक्षम बनवायला हवे. अशा विकासक्षम नागरिकांमुळेच राष्ट्राची प्रगती होते, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

खराडी येथील ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी येथे आयोजित 'भारत विकास परिषद विकलांग केंद्रा'च्या रौप्य महोत्सवी वर्षाच्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्त राज्यस्तरीय मोफत दिव्यांग शिबीर आयोजित करण्यात आले होते. ज्यामध्ये तब्बल १२०० दिव्यांगांना मॉड्युलर कृत्रिम हात व पाय बसविण्यासाठी मोजमाप घेण्यात येत आहे. सरसंघचालक पुढे म्हणाले, 'काही अंशी अहंकार ही माणसाला कार्य प्रवृत्त करण्यास आवश्यक प्रेरणा




ठरते. परंतू, त्या पलीकडे येते ती शाश्वत प्रेरणा. ती चिरंतन असते. त्यातून निर्माण होणारा सेवाभाव म्हणजे सेवानिष्ठांची मांदियाळी होय. आपलेपणाचा स्त्रोत एकसारखाच असतो त्यातून लोकोत्तर प्रेरणेने सेवा घडते. सेवा करण्याची प्रवृत्ती सेवितात सुद्धा निर्माण होते. सेवीत सुद्धा सेवा करणारे बनतात. हृदयस्थ नारायण आहे तो हे घडवून आणतो.' कार्यक्रमाला फाउंडेशनचे अध्यक्ष दत्ता चितळे, सचिव राजेंद्र जोग, केंद्र प्रमुख विनय खटावकर, ढोलेपाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील उपस्थित होते. कार्यक्रमात निता ढेकणे, शशिकांत बोरसे, अर्जुन सोनावणे, अनिकेत गाडेकर, वैजनाथ गोरख आणि नासिर शेख या दिव्यांगांना अत्याधुनिक मॉडयूलर पाय प्रातिनिधीक स्वरूपात प्रदान करण्यात आले. मॉड्यूलर फूटबद्दल सुमित भौमिक यांनी तांत्रिक माहिती दिली.

दिव्यांग केंद्राला आर्थिक मदत करणाऱ्या महाराष्ट्र नॅचरल गॅस, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, ब्रिज नेक्स्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज, ऑटो हँगर, वात्सल्य ट्रस्टच्या प्रतिनिधींचा सर संघचालकांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमात विनय खटावकर यांना पहिल्या 'दिव्यांग मित्र' पुरस्काराने गौरविण्यात आले. राहुल सोलापूरकर यांनी सूत्रसंचालन, तर दत्ता चितळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. भक्ती दातार यांनी वैयक्तिक गीत सादर केले आणि राजेंद्र जोग यांनी आभार मानले.

दिव्यांग सैनिकांचा सन्मान

भारतीय सैन्यात सेवा बजावलेले सैनिक ज्यांनी पॅरॉलॉंपिक खेळात विशेष कामगिरी बजावली आहे अशा सैनिकांचा सन्मान यावेळी करण्यात आला. यामध्ये विजयकुमार कारकी, चार सुवर्ण पदक विजेते व्हीलचेअर बास्केट बॉल चॅम्पियन मीन बहाद्दूर थापा आणि एअरक्राफ्ट्समन मृदूल घोष यांचा सरसंघचालकांनी सन्मान केला.

# मुख्यमंत्री फडणवीस सरकारकडून आ. राहुल कुल यांच्याबाबत निव्वळ आश्वासनांची हॅट्रीक; मंत्रिपद नाहीच

**दौंड । प्रतिनिधी**

दौंडचे आमदार राहुल कुल यांना मतदारांनी सलग तिसर्यांदा विधानसभेत पाठविण्याची हॅट्रिक केली, मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने आ. कुल यांच्या बाबतीत मंत्रिपदाचे आश्वासन देण्याचीदेखील हॅट्रिक पूर्ण केली आहे. दौंड तालुक्याला या वेळीदेखील मंत्रिपद न मिळाल्याने आ.राहुल कुल समर्थकांमध्ये या बाबतीत नाराजी निर्माण झाली आहे.

आ. कुल समर्थकांमध्ये या वेळी मोठी अपेक्षा ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून होती. या वेळी नक्कीच आ. राहुल कुल यांच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडेल, अशी कार्यकर्त्यांची खात्री होती. अनेकदा आ. कुल यांचे नाव संभाव्य मंत्रिपदाच्या यादीत होते. मात्र, ऐनवेळी आ. राहुल कुल यांना मंत्रिपदाच्या शर्यतीतून बाहेर काढण्यात आल्याने फडणवीस सरकारने आ. राहुल कुल यांच्या बाबतीत केवळ आश्वासनाची हॅट्रिक पूर्ण केल्याचे सध्याच्या परिस्थितीत दौंड तालुक्यात बोलले जात आहे.



सन २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी राहुल कुल यांना विजयी करा, मी त्यांना मंत्री करतो, असे आश्वासन दिले होते. रासपामधून आ. राहुल कुल हे निवडून आले. मात्र ऐनवेळी महादेव जानकर यांनी आपल्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पाडून घेतली. त्यानंतर सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आ. राहुल कुल यांच्या प्रचारार्थ केडगाव - चौफुला येथे सभा घेतली. त्या वेळी फडणवीस यांनी आ. कुल यांना निवडून पाठवा, मी त्यांना मंत्री करतो, असे आश्वासन दिले. मंत्रिपद मिळणार असे वाटत असतानाच एकनाथ शिंदे व अजित पवार हे महायुतीत सहभागी झाले आणि त्यांच्या पक्षाला मंत्रिपदाच्या जागा देण्यात आल्या. परिणामी आमदार राहुल कुल यांचे मंत्रिपद हुकले. सन २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा आ. राहुल कुल यांच्या प्रचारार्थ वरवंड येथे फडणवीस यांनी सभा घेतली. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मी आता ठरवूनच आलो आहे की, या वेळी राहुल कुल हे नक्की मंत्री होणार आहे. पण एक अट आहे की, आ. कुल यांना २० हजारांच्या आत मताधिक्य दिले, तर राज्यमंत्री देणार आणि २० हजारांपुढे मताधिक्य दिले तर कॅबिनेट मंत्रिपद देणार. सन २०२४ च्या झालेल्या विधानसभा निवडणुकीत आमदार राहुल कुल यांना १३ हजार ९०६ मतांचे मताधिक्य मिळाले. त्यामुळे दौंडकर जनतेला या वेळी नक्कीच तालुक्याला लाल दिवा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र या वेळीदेखील आमदार राहुल कुल यांना मंत्रिपदापासून वंचित ठेवण्यात आले आहे. यामुळे आज रोजी दौंड तालुक्यात कुल समर्थकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

## वाघोलीतील १४० सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न लागला मार्गी



वाघोली - वाघोलीतील १४० सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न मार्गी लागला आहे. वेतनातील फरक त्वरित त्यांच्या खात्यावर जमा करण्याचे आश्वासन सिद्धिविनायक ग्रुपच्या ठेकेदाराने महापालिका अधिकारी व माजी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत बैठकीत दिले.

वाघोलीतील १४० सफाई कर्मचाऱ्यांचा ठेका सिद्धिविनायक ग्रुपने घेतला आहे. त्यांचे वेतन १७,९०० असताना मागील दोन महिन्यापासून त्या कर्मचाऱ्यांना एक हजारा पासून चार हजारापर्यंत कमी वेतन मिळत होते. हे वेतन कमी का मिळते, याचे कारण कर्मचाऱ्यांना माहिती नव्हते. याबाबत त्यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य रामदास दाभाडे यांच्याकडे तक्रार केली होती. दाभाडे यांनी याबाबत नगर रोड क्षेत्रीय अधिकारी संजय पोळ यांनाही सांगितले. मात्र ठेकेदाराचा संपर्क झाला नव्हता. सोमवारी वाघोली क्षेत्रीय कार्यालयात महापालिका अधिकारी हनुमंत साळवी, अजय थोरात, ठेकेदाराचे व्यवस्थापक, रामदास दाभाडे, कल्पेश जाचक, शिवदास पवार, सुधीर दळवी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. कामगारांच्या महिन्याच्या हजेरीतील दिवसांचा फरक तांत्रिक कारणामुळे कमी लागल्याने त्यांचे वेतन कमी निघाल्याचे सिद्धिविनायकच्या व्यवस्थापकाने सांगितले. त्या दिवसांची खातरजमा करून फरक असलेले वेतन त्यांच्या खात्यात त्वरीत जमा होईल. असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच विमा, जॅकेट, पी एफ आदींचे पैसे कमी झाल्याचे त्याने स्पष्ट केले. यावेळी सर्व कामगारही तेथे जमले होते. वेतनाचा फरक मिळत असल्याने कर्मचाऱ्यांचे चेहरेही खुलले.

## डींग्रजवाडी परिसरात बिबट्यांचा वावर; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**कोरेगाव भिमा । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील डींग्रजवाडी मध्ये कोरेगाव भिमा धानोरे रस्त्यावरील चेअरमन वस्तीवर वर्दळीच्या ठिकाणी दोन बिबट्यांचा वावर पाहायला मिळाला. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

डींग्रजवाडी येथे मागील काही दिवसांपासून नागरिकांना बिबट्याचे दर्शन घडत आहे. काही दुर्घटना घडू नये यासाठी या भागात पिंजरा लावावा अशी मागणी केली जात आहे. दरम्यान, शिरूर तालुक्यातील डींग्रजवाडी हा भाग कृषीप्रधान भाग आहे. त्यामुळे जवळपास सगळीच माणसे शेतात कामावर असतात. परंतु मागील अनेक दिवसांपासून बिबट्या दिसत असल्याने घबराट पसरली आहे. डींग्रजवाडी गावापासून धानोरे गावाकडे जाणाऱ्या मुख्य रस्स्त्याच्या परिसरात असणाऱ्या चेअरमन वस्ती गणेश नगर ओढ्यालगत सर्वप्रथम हा बिबट्या दिसल्याचे शुभम गव्हाणे यांनी सांगितले. त्यानंतर अनेकांनी बिबट्या दिसल्याचे सांगितले. आजवर भिमा नदीच्या पलीकडच्या भागात बिबट्याचा वावर असल्याचे बोलले जात होते, परंतु आता नदीच्या अलीकडे एमआयडीसीच्या दारात बिबट्याचा प्रवेश झाल्याने स्थानिक नागरिकांसह कामगार व ऊसतोड मजूर वर्गात दहशतीचे वातावरण तयार झाले आहे. याबाबतची माहिती तात्काळ वन विभागाला कळविले असून लवकरात लवकर पिंजरा लावावा, अशी मागणी माजी सरपंच राहुल नरहरी गव्हाणे यांनी केली आहे.

# पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचा सुवर्ण महोत्सवी वर्ष सांगता समारंभ उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

रविवार दिनांक १५ डिसेंबर २०२४ रोजी विठ्ठल तुपे पाटील नाटयग्रह, हडपसर पुणे येथे पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँक लि. पुणे या बँकेचा सुवर्ण महोत्सव वर्ष सांगता समारंभ, गौरव अंक प्रकाशन, सभासदांना भेटवस्तु कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.



सदर कार्यकमाच्या अध्यक्षस्थानी कैलासराव (मामा) सखाराम कोद्रे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष विदयाधर अनास्कर उपस्थित होते. या प्रसंगी सर्व संचालक मंडळाच्या उपस्थित व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले.

पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेचे अध्यक्ष कैलासमामा कोद्रे यांनी सुवर्णवेध ५१ वर्षाच्या नात्याचा याबाबत बँकेच्या स्थापनेपासुन मनोगत व्यक्त केले. मनोगत व्यक्त करताना बँकेच्या सर्वांगिण प्रगतीची माहिती उपस्थित सभासदांना बँकेच्या दिली. बँक ही सभासदांची असुन सभासद तसेच सामान्य खातेदार यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी व त्यांचे व्यवसायामध्ये वाढ होण्यासाठी संचालक मंडळ काम करीत आहे. यामध्ये कार्यक्षम सभासद म्हणुन आपणही सहभाग घ्यावा व आपल्या परिवारातील सदस्य, नातेवाईक , मित्रमंडळी यांना बँकेची माहिती देवुन त्यांना आर्थिक सहाय्य तसेच इतर सुविधा आपल्या बँकेच्या मार्फत उपल्बध करून देणेविषयी सभासद या नात्याने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले.

आजही कोवीड १९ मध्ये संपुर्ण जग कोरोना महामारीमध्ये झालेली परिस्थिती विसरू शकत नाही. त्याकाळातही बँकेच्या सेवकांनी खातेदारांना निरंतर सेवा दिली याचा उल्लेख अध्यक्षांनी आवर्जुन केला. या महामारीचा फटका सामान्य जनता तसेच छोटे व्यावसायिक यांना बसला. या परिस्थितीमधुन त्यांना सावरण्यासाठी बँकेतर्फे कोवीड कर्ज माफक व्याजदरामध्ये सुरू करण्यात आले. व त्याचा फायदा जवळजवळ साडेतीन हजारापेक्षा जास्त खातेदारांना झाला व त्यांच्या कुटंबाला व व्यवसायाला हातभार देण्याचे सहकार्य बँकेतर्फे करण्यात आले, असेही त्यांनी सांगितले. सभेचे प्रमुख पाहुणे विद्याधर अनास्कर यांनी पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेला सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर अध्यक्षीय भाषणामध्ये राजकारण आणि सहकार या दोन वेगवेगळया गोष्टी असल्याचे मामांनी सांगितल्याचा उल्लेख केला. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना सर्व सभासदांनी कार्यक्षम असणे गरजेचे आहे, सहकार क्षेत्र वाढविण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील असुन यासाठी नवीन खाते प्रस्थापित करण्यात आले आहे. व सदर खात्याचे मंत्रीपद मुरलीधर मोहोळ यांच्या स्वरूपात आपले पुणे शहरास लाभले असुन याचा निश्चितच फायदा आपल्या सहकारी बँकांना होईल असे सांगितले. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की, आपल्या पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँकेला आजपर्यंत भारतीय रिझर्व्ह बँकेकडुन कोणताही दंड ठोठावण्यात आला नाही ही अभिमानास्पद असुन बँक ही सक्षम आहे आहे यावरून सिदध होते. यामागे कैलास मामा कोद्रे यांची कार्यप्रणाली, शिस्त, जिदद व पारदर्शकता दिसुन येत असल्याचे सांगितले. यानंतर मानपत्राचे वाचन डॉ. शुभांगी शिंदे यांनी केले. बँकेचे अध्यक्ष कैलासमामा कोद्रे यांना प्रमुख पाहुण्याच्या हस्ते मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. गौरव अंकाचे प्रकाशन प्रकाशन सभेच्या अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. सभासदांना भेटवस्तुचे वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे कॅन्टोन्मेंट सहकारी बँक लि. पुणे च्या सन २०२५ च्या दिनदर्शिकेचा प्रकाशन समारंभ बँकेचे संस्थापक संचालक व विद्यमान अध्यक्ष कैलासराव ( मामा ) सखाराम कोद्रे, संचालक मंडळ सदस्य व प्रमुख पाहुणे यांचे हस्ते करण्यात आले.